# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे


| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००४ |
| वर्ष | : | चौथे |
| अंक | : | ४ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या “ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ७९**

MAHMAR 19358/13/1/2000-TC



विद्या प्रसारक मंडळ

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष चौथे / अंक ४ / मार्च २००४

## संपादकीय

## नेमेचि येती परीक्षा...

परीक्षा मंडळ आणि परीक्षा मंडळाच्या परीक्षेच्या संदर्भात होणाऱ्या भ्रष्टाचाराच्या बातम्या हे या दिवसातलं वृत्तपत्रांचं ठळक लक्ष्य ! गेली कित्येक वर्षे या ना त्या स्वरूपात हा भ्रष्टाचार चालू आहे, कधी त्याचा आवाका वाढून आय्.आय्.एम्. लोकसेवा आयोगापर्यंत पोहोचतो, तर कधी दहावीपुरताच मर्यादित राहतो. कॉपी करणारी मुले कॉपी करीत आहेत याचे दृश्यही दूरदर्शनवर विनदिक्कतपणे दाखवले जाते आणि त्यातून इतर विद्यार्थ्यांच्या मनातील प्रामाणिकपणा, यश साध्य करण्यासाठी ते घेत असलेले कष्ट या सर्वांसमोर प्रश्नचिन्ह उभे राहते.

असे गैरप्रकार करणाऱ्यांना शासन केले जाईल, त्यांची हयगय केली जाणार नाही असेही सांगितले, बोलले (आणि छापलेही!) जाते. पण म्हणजे नेमके काय होणार, होणार हे नक्की का, तसे झाले का, याबद्दल मात्र कोणी काहीच सांगत, बोलत नाही.

हे पाहिले की परीक्षा पद्धतीला इतक्या वर्षांत आपण पर्याय का देऊ शकत नाही हे समजणे अवघड आहे. विद्यार्थ्यांसमोर भ्रष्ट आचरण करणारे पालक, शिक्षक यांनी आत्मपरीक्षण करावे असे त्यांना कधीच वाटत नाही काय? लाख लाख संख्येने असणारी परीक्षार्थींची संख्या, ती परीक्षा राबविण्याचा अनियंत्रित प्रचंड प्रदेश, केंद्रसंख्या आणि राज्यभर एकच अभ्यासक्रम राबविण्याचा हट्ट योग्य आहे काय, याचा विचार करायची वेळ आली आहे. "स्ट्राँगरूम" वीक होऊ शकते, मग ज्यांनी प्रश्नपत्रिका एका कागदाच्या सीलवर सही ठोकून कपाटबंद केल्या असतील अशा केंद्रांच्या सुरक्षिततेचे काय ?

बोर्डाविरोधात उघडपणे विद्यार्थ्यांसमोर बोलायला पालक, नातेवाईक धजावतात याचा अर्थ नीतिमत्ता किती धुळीला मिळाली आहे ते कळावे! सांस्कृतिक विकासाला प्रेरणा देणारी शिक्षण ही महत्त्वपूर्ण शक्ती आहे. याबाबत वर्षानुवर्षे आपण उदासीन राहिलो. परीक्षार्थींची संख्या आवाक्यापलीकडे नेत राहिलो आणि कल्पनाही येणार नाही इतकी परीक्षा पद्धती मोठ्या प्रमाणात राबवायचा हट्ट करीत राहिलो तर यावर तोडगा निघणे कठीण होईल. फेब्रुवारी, मार्च, एप्रिलमध्ये त्याच त्याच बातम्या छापल्या जातात, विसरल्या जातात, हे बदलायला नको काय ?

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष चौथे / अंक ४ / मार्च २००४

संपादक
डॉ. विजय बेडेकर

कार्यकारी संपादक
प्रा. मोहन पाठक

कार्यालय
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०

मुद्रण स्थळ :
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री संत तुकाराम महाराज (शिकवण) | शं. बा. मठ | ३ |
| २) | शब्दकोशाचा इतिहास | - | १२ |
| ३) | शिक्षण क्षेत्रातील महागाई | गोपी रवींद्र भोसले | १९ |
| ४) | भ्रष्टाचाराचे समूळ उच्चाटन | वामन मल्हार जोशी | २१ |
| ५ ) | पुस्तक परिचय- संवाद -वाचनीय व संग्राह्यदेखील ! | मोहन पाठक | ३८ |
| ६) | परिसर वार्ता | संकलित | ३९ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# श्री संत तुकाराम महाराज (शिकवण)

*संतसाहित्य व संतजीवनाचे अभ्यासक श्री. शंकरराव मठ यांच्या ओघवत्या शैलीतील हा लेख. - संपादक*

(लेखांक तिसरा)

## एकेश्वरवाद -

हे एक थोतांड नसून उपनिषद कालापासून याविषयी विचार करण्यात आलेला आहे. 'एकं एव अद्वितीयम्' पुराणकाळी - 'एको देव: केशवो वा शिवो वा ।' असे तत्व मांडले. साधुसंतांनी एकेश्वरवादाचाच पुरस्कार केलेला आहे. त्यांच्या अनुयायांनी हे पुढे टिकवले नाही, ही गोष्ट खरी आहे. तुकोबांनी एकविध भक्ती आणि अनेक देवतांचा निषेध केला आहे. वैदिक काळी अग्नी, इंद्र, वरुण इत्यादी देवतांची उपासना प्रचलित होती. पुढे ध्यानधारणा यातून तत्वज्ञानाचा खोल विचार झाला. ब्रह्मज्ञान उदयाला आले. तशी देवतांची उपासना मागे पडली. या देवतांना सामर्थ्य ब्रह्मापासूनच प्राप्त होते, हे उपनिषदावरून ध्यानात येईल. ब्रह्म इच्छेशिवाय अग्नी काडीही जाळू शकत नाही. जे तेज व ऐश्वर्य आहे ते सारे ब्रह्माचे आहे. या रीतीने ब्रह्माचे मनन-चिंतन विचारी लोकांत सुरू झाले. असा विचार करता करता निर्गुण ब्रह्माकडे विचारी मन झुकू लागले. साधारण लोकांच्या मनाला निर्गुण झेपेना, त्यांना सगुणच हवे होते. तत्वचिंतनापेक्षा सर्वगुणसंपन्न अशा ईश्वराची भक्ती त्यांना पाहिजे होती. जनतेची ही कामना तृप्त करण्यासाठी अवतारवाद निर्माण झाला.



अनेक पुराणे लिहिली गेली. राम आणि कृष्ण यांच्या भक्तीचा प्रसार झाला. राम व कृष्ण व्यक्ती भिन्न; परंतु एकाच देवाचे अवतार हे लोक विसरले नाहीत. उदक, जल, पाणी, शब्द वेगळे; पण वस्तू एकच. गोविंद, गोपाळ, कृष्ण, वासुदेव, नारायण, राम, जानकीनाथ ही नावे भिन्न; परंतु देवता एकच. ही जाणीव असूनही शैव, वैष्णव यांच्यात कलह माजत असे. परंतु हे दोन्ही एकच असून कार्ये भिन्न. एक-सृष्टी पालनकर्ता व एक सृष्टी-संहारक म्हणून विष्णू आणि शिव अशी भिन्न नावे व रूपे आहेत. अशा रीतीने एकत्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न झाला.

*हरीहरा नाही भेद । करूं नये वाद ।*
*एक एकाचे हृदयी । गोडी साखरेच्या ठायी ।*

*भेदकासी नाड । एक वेलांटीन आड ।*
*उजवे वामांग । तुका म्हणे एकची अंग ।*

गाथा - १२४

उदार धर्म ही आमच्या संस्कृतीची अतएव संतांची मिरासदारी आहे. देव एकच आहे व त्याहून दुसरा देव नाही, असे म्हणणारे संतच सर्वधर्मांतील लोकांचा देवसुद्धा एकच आहे व सर्व मानव एकाच देवाची लेकरे आहेत, ही साधी गोष्ट ओळखून होते.

## एकविध भक्ती -

एकविधता याचा अर्थ समजून घेतल्यास बरेच गैरसमज दूर होण्यास मदत होईल. एका देवाची प्रार्थना, त्याजजवळ मागणी, तो देईल ते आनंदाने स्वीकारणे, अन्यायाने किंवा वाईट कर्म करून मिळालेले धन, ते देवाने दिले नसल्याने स्वीकारणार नाही, संकट टाळण्यासाठी किंवा धनदौलत मिळविण्यासाठी वाईट कर्म करणार नाही, हीच खरी एकविधता होय. तुकोबा म्हणतात -

*आम्हा एकविधा पुण्य सर्वकाळ ।*
*चरण सकळ स्वामीचे ते।*

*चित्ताचे संकल्प राहिले चळण ।*
*आज्ञा ते प्रमाण करूनी असो।*

*दुर्जनापासून परतले मन । केले द्यावे दान होईल हो।*
*तुका म्हणे आता पुरला नवस । एकाविण ओस सकळही ।* (गाथा - २६६३)

*न पूजी आणिका देवा । न करी त्यांची सेवा ।*
*न मनीचा केशवा विण दुजे ।*

*काय उणे जाळे मज तयापाशी । ते मी मागो काई कवणासी।* (गाथा -१४६३)

*तू माझा मायबाप सकलचित्त गोत । तूचि माझे हित।*
*तूचि माझे देव । तूचि माझा जीव ।*

*तूचि माझा भाव पांडुरंगा । तूचि माझा आचार ।*
*तूचि माझा विचार । तूचि सर्वभार । चालविसी ।*

*सर्वभावे मन । तू होसी प्रमाण ।*
*ऐसी तुझा आण । वाहातसे।*

*तुका म्हणे तुज विकला जीवभाव ।*
*कळे तो उपाव करी आता ।*

(गाथा २४३५)

### जगाची दृष्टी -

आपले सर्व साधुसंत मोठे उदार होते. तसेच सुधारकही होते. संतानी पुरस्कारलेल्या सुधारणांमुळे त्यांच्या हयातीत लोकांकडून त्यांचा छळ होई. परंतु त्यांच्या निधनानंतर लोक त्यांचे देव्हारे माजवीत. लोक साधुसंतांना जवळ करीत व सुधारणा टाकून देत. म्हणून त्यांच्या सुधारणा चिरस्थायी झाल्या नाहीत. लोक संतांबरोबर न जाता त्याना खाली ओढून आपल्या पायरीवर आणत.

### तुकोवांचे परखड विचार -

तुकोबा निर्जीव गतानुगतिक नसून जागृत वृत्तीचे जिवंत व तेजस्वी सुधारक होते. आपल्या उमेदीच्या दिवसांत दुष्ट चालींचा व नाना प्रकारच्या दांभिक आचारांचा त्यांनी तीव्र शब्दांनी निषेध करून - असल्या दुष्ट चालींविरुद्ध बंडाचा झेंडा उभारला. तुकोबांचा देव एक विठोबा होता. सर्वसामान्य लोकांत चालणारी भुतंखेतं व क्षुद्र देवतांची पूजा त्याना पसंत नव्हती. त्यावर ताशेरा झाडला आहे.

*नव्हे जाखाई जोखाई । मायराणी येसाबाई ।*
*बलिया माझा पंढरिराव । जो या देवांचाही देव ।*

(गाथा-२३८४)

शाक्तांची विशेष झडती घेतली. असल्या हजेरीने जिजाईचे पित्त खवळले. रामेश्वर भट, मंवाजी यांना राग आला. परंतु त्या काळी ज्या दुष्ट प्रवृत्ती होत्या, जे अनाचार रूढ होते, त्यावर तुकोबांचा कटाक्ष होता. अज्ञानामुळे धर्मात भलतीसलती पाखंडे घुसतात. त्यांचा निषेध करणे, हे धर्ममार्ग चोखाळू पाहणाऱ्यांचे कर्तव्य आहे. देवाला आपण कोणत्या नावाने ओळखतो, हा महत्त्वाचा प्रश्न नाही; तर देवाचे यथार्थ स्वरूप आपणाला कितपत कळले आहे, आपला भाव त्याजविषयी किती शुद्ध आहे, आपला आचार कसा आहे, हे प्रश्न महत्त्वाचे आहेत. देवपूजेच्या नावाने आपण अनाचार करू लागलो, धर्माच्या नावाखाली द्वेष,मत्सर, विषयवासना या विकारांनी गोंधळ घातला तर तो धर्म नसून अधर्म आहे. वाईट आचार, हीन कल्पना, दुष्कर्म ही जेथे जेथे दिसतील तेथे तेथे त्याचा निषेध करणे हे धार्मिक लोकांचे कर्तव्य आहे. असमंजसपणा, दुराग्रह, पाप कोठेही असोत, विठोबाच्या भक्तांत असोत, त्यांचा निषेध केलाच पाहिजे.असा निषेध करण्याबद्दल कोणालाही दोष देता येत नाही.

तुकोबांनी पंथाची निंदा केली नाही. त्या पंथात रूढ असलेल्या अनाचारावर ताशेरा झाडला आहे. अन्न

जीवनाचे जीवन असले तरी त्यात विष कालवले की ते विषासमान होते. अनाचार व पाप धर्माचा वेष पांघरतात. धर्माच्या नावाखाली खपतात. ती उघडकीस आणल्यास छळ केला जातो. म्हणून धर्मबुद्धीचे कार्य करू नये, असे म्हणता येणार नाही. वृक्षाचा कोमल अंकुर कठीण जमिनीतून वर येतो. पाण्याचा झरा खडक फोडून बाहेर जातो, कलावंताची कला ही प्रकट होते. या साऱ्या गोष्टी प्रतिकूल परिस्थितीतून वर येतात. म्हणून संत अगर सुधारक यांच्या हृदयात असणारा सद्विचार आणि सद्भाव यांचा झरा खळखळ वाहणाऱ्या जलप्रवाहाप्रमाणे बाहेर पडल्याशिवाय राहात नाही. ही परमेश्वरी योजनाच असते. 'काय करूं मज देवें बोलाविले। माझे खोळंबले काय होते।' तुकोबा असे म्हणत. आपल्या अंत:करणात उचंबळणाऱ्या विचारांचा प्रेरक परमेश्वर आहे आणि त्या विचारांचा प्रसार करणे, हे आपले कर्तव्य आहे असा तुकोबांचा दृढविश्वास होता. त्यांनी कोरडे ओढले, पण त्यात जनहित होते. वैद्याची भूमिका आमची आहे, असे तुकोबा म्हणत. गुरुबाजीचे बंड तुकोबांनी मोडून काढले. शुद्धभाव पाहिजे. त्याशिवाय भजन पूजन व्यर्थ.

*कासया पाषाण पूजिती पितळ ।*
*अष्ट धातु खळ भावेविण ।*
*भावचि कारण भावचि कारण ।*
*मोक्षाचे साधन बोलियेले ।*

(गाथा - २८२७)

ढोंगी लोकांवर कोरडे ओढले आहेत -

*ऐसे संत जाले कळी । तोंडी तंबाखूची नळी ।*
*स्नान संध्या बुडविली । पुढे भांग वोढविली*
*भांग भुर्का हे साधन । पचनी पडे मद्यपान ।*
*तुका म्हणे अवघे सोंग । कैसा तेथे गोविंद।*

(गाथा -२८५७)

व्यवहार निराळा व तत्त्वज्ञानाचा प्रांत निराळा, अशी समजूत रूढ झाली आहे. बोले तैसा चाले । त्याची वंदावी पाउले। असे तुकोबा म्हणतात.

*कथनी पढणी करूनी काम ।*
*वाचुनी रहाणी वाया जाय ।*

(गाथा -२३५३)

भक्ती आणि अद्वैत

हिंदू लोकांस भक्तीची आवड आहे आणि तत्त्वज्ञानाची भूक आहे. तत्त्वज्ञानाशिवाय धर्म लंगडा आहे, अशी आपणांत समजूत आहे. महाराष्ट्रात शांकर मताचा प्रचार जारीने झाला. मुकुंदराज, ज्ञानेश्वर, वगैरेंनी अद्वैताचे निरूपण केले. भागवतात भक्ती व अद्वैत यांची बांधणी आहे. अर्जुनाला विश्वरूप दर्शन आवडले, पण भीतीही वाटली. 'प्रव्यथितं मनो मे ।' असे अर्जुनाने श्रीकृष्णाला सांगितले. श्रीकृष्ण म्हणतात - परी आता ऐसी चाडजिवी । ते तुजसी गोठी करावी । जवळिक हे भोगवी । आनंदासाठी ।

ज्ञा. ११-५९०

तुझ्याशी बोलावे, गोष्टी कराव्यात, तुला आलिंगन द्यावे, हेच मला बरे वाटते. तुकाराम म्हणतात -

*आत्मस्थिती मला नको । हा विचार देई ।*
*निरंतर चरण सेवा । जन्मो जन्मी तुझा दास ।*
*पुरुषोत्तमा हेचि गोडी । माझ्या देई जीवा ।*

(गाथा - ३५७७)

*हेचि दान देगा देवा ।* (गाथा - २३०६)

यात तुकोबा स्पष्ट सांगतात- मला मुक्ती नको, सत्संग दे. तुझी भक्ती दे. माझ्याहातून तुझी सेवा घडू दे. शंकराचार्य, ज्ञानदेव, एकनाथ महाराज हे अद्वैत बोलतात. पण तिघेही हृदयाचे कवाड उघडून देवाजवळ जाताना मी भक्त तू देव असेच म्हणून देवाला आळवितात. देवाची उपासना करतात. अद्वैत हा अनुभवाचा विषय आहे, शुष्क वाद

घालण्याचा नाही.

**लौकिक विद्या - आध्यात्मिक ज्ञान**

लौकिक विद्या आपल्याला ठाऊक नसलेल्या गोष्टींची माहिती देते. आध्यात्मिक विद्या मनात सुप्तावस्थेत असलेल्या ज्ञानाला जागृत करीत विसरलेल्या गोष्टींचे स्मरण करून देते. कर्तव्य, आद्धिर्म याविषयीचे देवाचे संदेश तारायंत्रासारख्या उपकरणाशिवाय आपल्या हृदयात पोहोचविते. भीतीला देशोधडीस लावून निश्चय दृढ करते. कार्य करण्याचे सामर्थ्य देते. इंद्रियांद्वारा होणाऱ्या ज्ञानापेक्षा अंत:करणात प्रकट होणारे ज्ञान अधिक प्रभावी असते. शब्दज्ञानापेक्षा वाणीची जेथे गती नाही तेथून येणाऱ्या ज्ञानाची योग्यता अधिक आहे. ग्रंथ वाचून, वादविवाद करून, लोक वाचाळपणा करतात. पण ईश्वरप्राप्तीचे मार्ग शब्दात नाहीत, मंत्रतंत्रात नाहीत, चित्तात वैराग्य आणून, देहभान विसरून, देवाचे चिंतन केले तरच अंत:करण तद्रूप होते.

**पूर्णबोध -**

तुकोबांनी वाघजोला उपदेश केला. त्याला त्यांनी पूर्णबोध असे नाव दिले आहे.

मानव देह हे शेत आहे. या शेताची प्राप्ती होऊन जे भक्ती करतात त्यांना चांगले पीक येते. जे भक्ती करीत नाहीत, संसाराचा भार शिरावर वाहून कष्टी होतात, त्यांना तूट येते. येथे ऐंशी टक्के सारा द्यावा लागतो. हा सारा दिला नाही तर तर काळाजवळ आपल्याला जबाब द्यावा लागतो. पैकी दहा टक्के देऊन टाकले. अद्याप सत्तर टक्के द्यावयाचे आहेत. ते फेडायला माझी काही ऐपत नाही. दहा टक्क्यांची फेड मी अशी केली. देहात दहा इंद्रिये आहेत. त्यांचा उपयोग सुखोपभोगासाठी न करता मी ती देवाला अर्पण केली. आता सत्तर टक्के बाकी आहे. त्यासाठी पांडुरंग तगादा लावीत आहे. तो म्हणतो - हंडा, भांडी, गुरे देऊन हा सारा चुकता कर. म्हणून जवळ जे आहे ते दान करून टाक. उद्या द्वादशी आहे. सकाळी लवकर उठ, स्नान कर, ब्राह्मणाला बोलाव, संकल्प कर आणि घर लुटीव. विठ्ठलाच्या पायाशी सर्व संसार वाहून टाक. हा उपदेश ठसला. दुसऱ्या दिवशी घर लुटविले.

**सामान्य मानव**

मनुष्य स्वभावत: स्वार्थी असतो. त्याचे लक्ष आहार, विहार, प्रजोत्पत्ती आणि आत्मसंरक्षण याकडेच असते. कोणत्याही रीतीने वासना पुरवून इंद्रियांना तृप्त करावे, अशी त्याची प्रवृत्ती असते. या प्रवृत्तीस हळूहळू आळा घालावा, हे धर्माचे व नीतीचे धोरण असते. कोणतेही बंधन नसेल तर मनुष्य पशूप्रमाणे वर्तन करून आपल्या हीन वासना पूर्ण करू पाहील. ही त्याची पशुवृत्ती बदलण्यासाठी बायका-मुलांची जबाबदारी त्याजवर टाकली जाते.

*प्रपंची जो सावधान । तो परमार्थ करील जाण ।*
*प्रपंची जो अप्रमाण । तो परमार्थी खोटा ।*

दासबोध - १२-१-९

तुकाराम आपल्या अनुभवावरून सांगतात - *आता तरी पुढे हाचि उपदेश । नका करू नाश आयुष्याचा ।*

*सकळांच्या पाया माझे दंडवत ।*
*आपलाले चित्त शुद्ध करा ।*

(गाथा १०१)

नित्य जागरूकता हेच स्वातंत्र्याचे मोल आहे.

*सदा पाहिजे अंकुश । नित्य नवा दिंस जागृतीचा ।*
*आहे देव ऐसा वदनी वदावे । नाही ऐसा मनी अनुभवावे ।*

**देवाचे स्मरण -**

*स्मरण तेचि मुक्ती । विस्मरण तेची अधोगति ।*
*नामाचा उच्चार । मुख्य हेचि भक्ती ।*
*एका जनार्दनी विरक्ती । तेणे जोडे ।* (गाथा-२४८४)

*लवण मेळविता जळे । काय उरले निराळे ।*
*तैसा समरस जालो । तुजमाजी हरवलो*

*अग्नी कापुराच्या मेळी । काय उरली काजळी ।*
*तुका म्हणे होती । तुझी माझी एकज्योती ।*
(गाथा-२४८४)

देशकाल वस्तुभेद मावळला । आत्मा निर्माळला
विकाकार । न जाला प्रपंच आहे परब्रह्म ।
अहं सोऽहं ब्रह्म आकळले । तत्त्वमसि विद्या ब्रह्मानंद
संथ । तेचि झाला अंगे तुका आता ।

निरंजनी आम्ही बांधियले घर । निराकारी निरंतर राहिलो
आम्ही । निसभासी पूर्ण जालो समरस ।

अखंड ऐक्यास पावलो आम्ही । तुका म्हणे आता नाही
अहंकार । जालो तदाकारे नित्यशुद्ध ।
गाथा - ४३२६

भयाचा निरास करणे, हे धर्माचे कार्य आहे. कलिकाळाचे भय धर्म निरसन करतो. त्यालाच सनातनी मोक्ष म्हणतात. एक गोष्ट विशेष करून आढळते. या जन्ममरणाच्या फेऱ्यातून सुटका व्हावी, यासाठी मानवजन्म म्हणजे मोठी आपत्ती आहे. आरंभापासून शेवटपर्यंत त्यात दुःख, दैन्य, दारिद्र्य, संकटे भरलेली आहेत. अशी वर्णने संतवाङ्मयात आढळतात. गेला दिवस चांगला होता.आता विपरित काळ आला आहे. जगात सर्वत्र फेरबदल चालला आहे.धर्माच्या ठायी लोकांची श्रद्धा नाहीशी झाली आहे. आचार सुटला, अशी ओरड सदासर्वदा चालली आहे. नवीन विचार, नवीन कल्पना उदयाला येतात. जुने निर्बंध सुटतात; परंतु तेवढ्याने मानवजातीची अवनती होत आहे असे सिद्ध होत नाही.

**विचारक्रांती हितावह -**

हा बदल योग्य प्रमाणात झाला नाही तर समाजावर क्रांतिकारक प्रसंग ओढवतात. क्रांती हे समाजावर वा धर्मावर येणारे संकट नसून समाजाचा गाडा सुस्थितीवर किंवा चांगल्या मार्गावर आणण्यासाठी योजलेला एक उपाय आहे. वैदिकांचा अध:पात होत असता बौद्धांची चळवळ झाली. बौद्ध समाजाचा अध:पात होऊ लागला तेव्हा शंकराचार्यांनी दुसऱ्या बाजूने गती दिली. शंकराचार्यांनी सांगितलेल्या उपायांत समाजात दुही माजविणाऱ्या सत्ता आणि ज्ञान, क्रियाशून्य अशा थोड्या लोकांच्या हाती ठेवण्यात आले. त्यामुळे बहुजन समाज परावलंबी व प्रज्ञाहत झाला. त्यामुळे समाज पुन: विस्कळित झाला. मुसलमानांची चढाई सुरू झाली. दोन संस्कृतीत झगडे झाले. पुढे संतांच्या विचारसरणीने क्रांती झाली. एकोणिसाव्या शतकात इंग्रजी विद्येने केलेले क्रांतीचे परिणाम अजून आपल्या दृष्टीस पडत आहेत. क्रांती हा कलियुगाचा प्रभाव आहे असे म्हणण्याचा आपल्या देशात प्रघात आहे. परिस्थिती, वाढते ज्ञान व धर्म आणि नीतीच्या कल्पना यात मेळ घालण्याचा प्रयत्न हे त्या त्या काळच्या महात्म्याचे काम आहे. बुद्ध, महावीर यांनी एका दिशेने तसेच कुमारील भट्ट, शंकराचार्य यांनी दुसऱ्या दिशेने हे काम केले. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम यांनी आपल्या परीने आपआपल्या काळी हे काम केले. त्यांना चोखामेळा, बरवा, शेख महंमद, कान्होपात्रा वगैरे मंडळींनी हातभार लावला. राजा राममोहन रॉय, महादेव गोविंद रानडे, महात्मा गांधी, इत्यादींनी अर्वाचीन काळात हे काम केले. तुकोबांनी असे काम केले. संसारतापाने तप्त होऊन या जंजाळातून सुटका करून घेण्यासाठी त्यांनी देवाची कास धरली. देवाची सेवा केली. भक्तीच्या प्रवाहात बुडी मारली. जेणेकरून त्यांचे जन्ममरणाचे भय नाहीसे झाले.तुकाराम सांगतात - लोकलज्जेला बळी पडून, जननिंदेला भिऊन श्रेष्ठ धर्माचरणास अनमान करू नका. असा देवाच्या आज्ञेने तुकोबा डांगोरा पिटीत आहेत. लोक रुळलेल्या वाटेने जातात. प्रतिष्ठित माणसे तिथेच त्यांना डांबून ठेवू पाहतात. तुकोबा अशा अधिकारी पुरुषांपैकी एक होते.

*आम्ही वैकुंठवासी । आलो याचि कारणासि ।*
*बोलिले जे ऋषी । साचभावे वर्ताया ।*

*झाडू संतांचे मारग । आडरानी पडले जग ।*
*उच्छिटाचा भाज । शेष उरले ते सेवू ।*

*अर्थे लोपली पुराणे । नाश केला शब्दज्ञाने ।*
*विषय लोभी मने । साधने बुडविली ।*

*पिटू भक्तीचा डांगोरा । कळिकाळासी दरारा ।*
*तुका म्हणे करा । जयजयकार आनंदे ।*

(गाथा - ५२०)

तुकारामांचा अनुभव

*आपुलिया बळे नाही मी बोलत । सखा कृपावंत*
*वाचा त्याची । साळुंकी मंजुळ बोलतसे वाणी ।*

*शिकविता धनी वेगळाची । काय म्या पामरे*
*बोलावी उत्तरे । परी त्या विश्वंभरे बोलाविले ।*

*तुका म्हणे त्याची कोण जाणे कळा ।*
*चालवी पांगळा पायावीण ।*

(गाथा - २९५०)

विठ्ठलाने हा सोपा मार्ग तुम्हाला सांगण्यासाठी मला सांगितला आहे.

*सेवितो हा रस वाटितो आणिका ।*
*घ्यारे होवू नका रानभरी ।*
*विटेवर ज्यांची पाऊले समान ।*
*तोचि एक दानशूर दाता ।*
*मनाचे संकल्प पावतील सिद्धि ।*
*जरी राहे बुद्धी याचे पायी ।*
*तुका म्हणे मज धाडिले विशेषा ।*
*मार्ग हा सोपा सुखरूप ।*

(गाथा -३४४)

पुरातन काळापासूनच सर्वांचा अनुभव हाच आहे की, मन विषयापासून परावृत्त करून अंतर्मुख करण्याचा अभ्यास केल्याने चित्तशुद्धी होते आणि शाश्वत सत्याचा साक्षात्कार होतो. याच शाश्वत सत्याला कोणी ब्रह्म, कोणी परमेश्वर, कोणी आदितत्त्व असे म्हणतात.

ध्येयप्राप्ती -

ईश्वरप्राप्ती हे धार्मिक माणसाचे ध्येय असावे. पशुत्वाचा त्याग करून मानव जन्माला आला. पुढील पाय व मागील शेपूट नाहीसे झाले. पण पशुत्वाचे अवशेष त्याच्या शरीरात व मनातही गूढ रूपाने राहिले आहेत. परमार्थाच्या मार्गात अडथळे आणि संकटे आली. "रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग । अंतर्बाह्य जग आणि मन ।" तुकोबा अगतिक झाले. इतके झाल्यावरच त्यांना आपले ध्येय गाठता आले. ते म्हणतात -

भावाचिया बळे । आम्ही निर्भर दुर्बळे ।
नाही आणिकांची सत्ता । सदा समाधान चित्ता ।

तर्का नाही ठाव । येथे रिधावया वाव ।
एकछत्री राज्य। तुक्या पांडुरंगी काज ।

(गाथा - १९००)

विषयी विसर पडिला नि:शेष ।
अंगी ब्रह्मरस ठसावला।

(गाथा - १५३१)

*याज साठी केला होता अट्टाहास ।*
*शेवटचा दिवस गोड व्हावा ।*
*आता निश्चिंतीने पावलो विसावा ।*

*खुंटलिया धावा तृष्णेचिया ।*
*कवतुक वाहे जाणिया वेचावे ।*
*नाव मंगलाचे तेणे गुणे ।*
*तुका म्हणे मुक्ती परिणली नोवरी ।*
*आता दिवसचारी । खेळी मेळी ।*

(गाथा-१३२८)

*माझे मनोरथ पाविले जै सिद्धि ।*
*तईपाई बुद्धि स्थिरावली ।*

(गाथा -१४७४)

*तेणे सुखे माझे निवाले हे अंग । विठ्ठल हे जग देखियले । तुका म्हणे सुख जाले माझ्या जीवा । रंगले केशवा तुझ्या रंगे ।*

(गाथा -३३६५)

भक्तिपंथाचे एक तत्त्व आहे की, भक्ताचे चित्त शुद्ध करण्यासाठी देव त्याच्यावर नाना प्रकारची संकटे आणतो; त्यावर देवाचे प्रेम असते. त्याच्यावर संकटे आणून त्याला तो तावून सुलाखून घेतो. बहिणाबाईंनी भागवत धर्माचा इतिहास थोडक्यात असा दिला आहे. '*संत कृपा झाली । इमारत फळा आली । ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया । नामा त्याचा किंकर । तेणे केला हा विस्तार । जनार्दन एकनाथ । ध्वज उभारिला - भागवत । तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ।*

**सत्यज्ञान -**

अध्यात्म मार्गात आपण जे जाणतो ते ज्ञान नाही, तर जे अनुभवतो ते ज्ञान. मी ब्रह्म आहे, जीव ब्रह्म आहे ही वाक्ये उगाच नाहीत. अज्ञान निरसनानंतर होणारे हे दर्शनही आहे. आपण ब्रह्मच आहोत. अपण कधी बद्ध नव्हतो, सर्वदा मुक्त आहोत. व्यवहारात व परमार्थात विचार आणि क्रिया यांची सांगड घातली पाहिजे. बुद्धीच्या कसरतीने, तार्किकाच्या कोट्यांनी कोणालाही संसार जिंकता येणार नाही. तुकोबांनी देवाची सेवा करून आणि शुद्ध भक्तीचा मार्ग चोखाळून संसार जिंकला. संसार जिंकण्याचा व परामार्थ गाठण्याचा सुगम मार्ग सर्वांसाठी दाखवून दिला. हा मार्ग भक्तिमार्ग आहे. सर्व शास्त्र एकमेकांना पोषक आहेत. इतिहास, गणित, तत्त्वज्ञान तसेच भौतिक परमार्थाला पोषक आहेत. या शास्त्रातील सिद्धांतांची अवहेलना केल्याने परमार्थाची हानी होते आणि नाना प्रकारचे धर्मवेड बळावतात.

**तुका गेला वैकुंठासी -**

तुकोबा सदेह वैकुंठाला गेले, अशी एक भावना कशी आली तो अभंग -

*तुका उरला तुकी नवल झाले तिही लोकी ।*
*नित्य करितो कीर्तन हेचि माझे अनुष्ठान ।*

*तुका बैसला विमानी । संत पाहती लोचनी ।*
*देव भावाचा भुकेला । तुका वैकुंठासि गेला ।*

माझी परीक्षा पाहण्यासाठी देवाने जे नानाविध प्रसंग मजवर आणले त्यातून मी पार पडलो, ही एक विस्मयकारक गोष्ट आहे. कीर्तन करून परमार्थ साधावयाचा, हाच माझा साधन मार्ग. मला परमेश्वराच्या सान्निध्याचे, साक्षात्काराचे सुख अनुभविण्यास मिळते. ते संत प्रत्यक्ष पाहात आहेत. देव भावाचा भुकेला आहे. त्याने माझा अंगीकार केला. तुकोबांचे वैकुंठ म्हणजे वर कोठेतरी आकाशात होते अशातली गोष्ट नव्हती. इंद्रियांवर जय मिळविला, भेदभाव नाहीसा झाला, वैषम्य धुऊन काढले, भुती भगवंत दिसू लागला, मनुष्य व भूतमात्रावर प्रेम करू लागला की त्याचे मरण मरून गेले. त्याची काया ब्रह्म झाली, असे तुकोबांचे म्हणणे आहे. तुकोबांनी वैकुंठ पृथ्वीवर आणले, 'तुका म्हणे घरी आणले वैकुंठ । वसविली पेठ वैष्णवांची । दुसऱ्या दृष्टीने ते म्हणत-पुसाल तरी आम्हा वैकुंठीचा वास । परी नाही राहास ठाव कोठे ।

**तुकोबांचे विचारकाव्य**

तुकोबांचे विचार व कल्पना यांच्यात एक प्रकारचा ताजेपणा दिसून येतो. हे उद्गार तुकोबांच्या अंत:करणापासून आले आहेत. दुसऱ्याचे उसनवार नाहीत. तुकोबा संत व कवीपण होते. त्यांचे कवित्व हे भक्तीचे आणि ईश्वरसेवेचे एक साधन झाले. तुकाराम अंत:करणाची भाषा बोलतात. त्यांच्यापुढे तर्क लंगडा पडतो. क्षुद्र हेतू

विरघळून जातात. अहंकार नष्ट होतो. अंत:करण अंत:करणाशी संभाषण करते. सूर्याचा स्थिर प्रकाश, चंद्राची शीतलता, विजेची चपळता, रमणीय तेज ही त्यांच्या काव्यात एकवटली आहेत. संतांच्या चरित्रातील उणिवा, शोधत बसण्यापेक्षा त्यांच्या साधुत्वावर दृष्टी स्थिर करणे अधिक हितावह आहे. नम्र व्हा, कृत्रिम कुंपणे काढून टाका, ही खरी उच्च शिकवण आहे. अशा प्रकारचा धर्म शिकवणीमुळे माणसे दुर्बल व संसार करण्यास नालायक होतात अशी ओरड केली जाते. हे तपासून पाहिले पाहिजे.

**व्यक्तिमत्त्व -**

तुकोबा अत्यंत नम्र व परोपकारी होते. त्यांच्या ठिकाणी अनन्य निष्ठा होती, त्यांनी देवावर सर्व भार घातला होता. तुकाराम मनुष्यच होता. इतर माणसांप्रमाणे त्यांच्यात प्रबळ मनोविकार होते. या विकारांबरोबर ते झगडले व त्यांच्यावर त्यांनी जय मिळविला. तमोगुण हळूहळू झडून त्यांच्या अंगच्या दैवी गुणांची वाढ झाली. परमेश्वराची सेवा करून त्यांनी कृपा संपादन केली. त्यांच्यावर आलेली संकटे, संकटांना तोंड देण्याची त्यांची वृत्ती या सर्व गोष्टी आम्हाला उद्बोधक व मार्गदर्शक आहेत. मनुष्य दुर्बल व स्खलनशील आहे. देवाच्या यथार्थ स्वरूपाचे पूर्णपणे आकलन होणे ही गोष्ट त्याच्या शक्तीच्या बाहेर आहे. त्यांनी केलेला उपदेश आमच्यासारख्या स्खलनशील माणसांच्या आटोक्यातील आहे.

तुकोबांचे विठ्ठल कुलदैवत होते. विठोबाची वारी त्यांच्या घराण्यात होती. भजन, पूजन त्यांच्या घराण्यात पूर्वीपासून चालत आलेले होते. आईच्या दुधाबरोबरच त्यांनी विठोबाचे भाव व विठोबाची भक्ती ग्रहण केली. तुकाराम भाविक होते, पण भोळसट नव्हते, अल्पसंतुष्ट नव्हते. नुसते नाम गाऊन त्यांचे समाधान होण्यासारखे नव्हते. भाव पाहिजे, इंद्रियनिग्रह करता आला पाहिजे, अशी त्यांची धारणा वाढत चालली होती. ते कसून आत्मपरीक्षण करीत. संसाराचा ऐहिक व पारलौकिक संग्राम ते लढले व यशस्वी झाले. तोंडघशी न पडता थोर भाग्यवंत सेनानीप्रमाणे नवीन यश संपादण्यासाठी सामर्थ्य प्राप्त करून यश मिळविले. त्यांची दृष्टी विशाल होती, स्वत: पुरती नव्हती. बुडती हे जन न देखवे डोळा । म्हणूनी कळवळा येत असे ।

**प्रपंच व परमार्थ**

प्रपंच आणि परमार्थ यांच्यात छत्तीसचा आकडा आहे. या दोघांचे केव्हाही जमत नाही, अशी अनेकांची समजूत आहे. उपनिषद् काळीही ही समजूत आढळते. बुद्धकाळी ही समजूत बळावली व अतिरेक झाला. उपरती होताच संसाराचा त्याग करावा (जबाली उप.) हे आचार्यांनी मानले. या संन्यासाची मोहिनी जनमानसावर फार पडली. प्रपंच व परमार्थ एकत्र साधणे म्हणजे अशक्यच, असे उद्गार अनेक ग्रंथांत आढळतात. प्रपंच ही इंद्रियांना योग्य वळण लावून आत्मोन्नती साधण्याची शाळा आहे. मानवजातीची उन्नती करण्यासाठी स्थापिलेली संस्था आहे. म्हणून प्रपंच हाच परमार्थ केला पाहिजे. प्रपंच धर्माचा केला पाहिजे. हरिनामाचा स्पर्श करून, स्मरण, कीर्तन इत्यादी साधनांनी देवाचे साह्य प्राप्त करून घेऊन प्रपंच केला, नेटाने अभ्यास केला, धीर धरला तर ही गोष्ट साध्य होते. संसार परमार्थमय होतो, आणि जनार्दन दिसू लागतो. अवघे जग ब्रह्ममय दिसू लागल्याचा अनुभव येतो. हा तुकोबांचा संदेश आहे. प्रपंच परमार्थ संपादित दोन्ही । एकटी निदानी न घडे त्याची । हे बरोबर नाही. तुकोबा म्हणतात -

*धर्माचे पालन करू अधर्माचे खंडण ।*
*हेचि आम्हा करणे काम । बीज वाढवावे नाम ।*

(गाथा -२१३६)

*जोडोनिया धन उत्तम व्यवहारे ।*
*उदास विचारे वेच करी ।*
*उत्तमाची गति तो एक पावेल ।*
*उत्तम भोगीत जीव खाणी ।*

गाथा २८६४

*नको सांडू अन्न । नको सोडू जन ।*
*चित्ती नारायण सर्वभोगी ।*

(गाथा -२३६८)

*नको त्यजू स्त्रियापोर ।*
*बांधी सोपे माझ्या घर ।*
*आलया अतिथा आदर ।*
*याहुनी धर्म कोणता ।*

*करी नामाचा गजर ।*
*आणि संतांची कदर ।*
*तुका म्हणे तोचि नर ।*
*ब्रह्म ज्ञानी पुसता ।*

विशाल दृष्टी

कोणाही एका माणसाची किंवा ग्रंथाची शिकवण सर्व काळी, सर्व स्थळी, सर्व लोकांस पुरेशी आहे, असे समजणे हा भ्रम आहे. जगात स्थिर असे काहीच नाही. पृथ्वी काही दिवसांनी हजारो कोस दूर जाईल. संसाराचे स्वरूप पालटेल. एकच ग्रंथ प्रमाण मानणारी माणसे आपली व दुसऱ्यांचीही फसवणूक करतात. धर्म म्हणजे डबक्यातले पाणी नसून सतत वाहात राहणाऱ्या जिवंत झऱ्याचा प्रवाह आहे. सृष्टीत नित्य अनेक घडामोडी होत असतात. देशकालमानाप्रमाणे परिस्थिती बदलत असते. आपणापुढे येणाऱ्या सगळ्याच प्रश्नांचा उलगडा ठराविक - ग्रंथांवरूनच झाला पाहिजे, हे दुराग्रहाचे व अप्रगत लक्षण आहे. त्यातील ज्ञानाचा जरूर उपयोग करून पुढील प्रश्न सोडवण्यास मदत घेणे आवश्यक हवा, पाणी, प्रकाश परमेश्वर मुबलक देत आहे. मग या झरोक्यापासून सर्व काही प्राप्त होईल हे म्हणणे अयोग्य. त्याचा अर्थ परमेश्वर शतपटीने देत असताना त्याचा अव्हेर करणे असा होईल. संसार करून परमार्थ साधणे हे भक्तिमार्गाचे ध्येय आहे. भक्तिमार्ग हा सामुदायिक धर्म आहे. भजन आणि कीर्तन ही त्याची प्रधान अंगे समुदायानेच साधण्यात येतात. आषाढी कार्तिकीच्या यात्रा संघटित स्वरूपात आनंदाने करण्यात येतात. भक्तीने लाभणारा आनंद साधे - भोळे, शिक्षित-अशिक्षित सर्वचजण एकत्र अनुभवतात. बायकामुलांची हेळसांड करावी, उपाधी टाळावी, हे भक्तिमार्गाचे साधन नाही.

भक्ताला संसार सोडावा लागत नाही, तर अहंकारामुळे, विषमतेमुळे, संकुचित भावनेने संसाराविषयी जी आसक्ती वाणते, ती आसक्ती सोडावी लागते. आसक्तीमुळेच मनुष्य अधर्म करावयास प्रवृत्त होतो.

संतपण -

विष्णुमय जग ही संतांची खूणगाठ -

*देवाची पूजा हे भूतांचे पालन ।*
*मत्सर तो शीण वहुतांचा ।*
*रुसावे फुगावे आपुलियावरती ।*
*उरला तो हरी सकलही ।*
*तुका म्हणे संतपण याचि नावे ।*
*जरी होय जीव वहुतांचा ।*

(गाथा-३८५४)

भूतमात्रांचे पालन व त्यांची सेवा हीच देवाची पूजा, द्वेष-मत्सर हेच दुःखाला कारणीभूत. रागावणे, रुसणे स्वतःवर आपणाहून दुसरे ते हरीनेच मना केले आहे. म्हणून द्वेष कोणाचा नाही. सर्वांच्या हितासाठी झटणे, हेच संतपण.

इति शम्

(लेखमाला समाप्त)

शं. वा. मठ
६, कुमार आशिष,
राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.

•••

# शब्दकोशांचा इतिहास

मराठी वाङ्मयात शब्दकोशांची निर्मिती प्राचीन असली तरी खरी सुरुवात इंग्रजी आमदनीच्या प्रारंभापासून होऊ लागली. पाश्चात्य देशांत जी कोशनिर्मिती झाली व आपल्या देशात जी कोशनिर्मिती झाली, त्याची कारणे सर्वसाधारण एकच असली तरी दोन्ही देशांतील परिस्थिती भिन्न असल्याने कोशनिर्मितीचे हेतूही बदलले असले तरी प्रारंभी कोशनिर्मितीचा हेतू समानच आढळतो. इंग्लंडमध्ये ग्रीक व लॅटिन या भाषांचे वर्चस्व दीर्घकाळपर्यंत होते. विशेषत: धार्मिक ग्रंथांची भाषा लॅटिन होती. अशा धर्मग्रंथांचा अभ्यास व निर्मिती धर्मोपदेशकच करीत. जेव्हा एखाद्या माणसाला हे ग्रंथ अभ्यासण्याची वेळ येई तेव्हा त्या शब्दांचा अर्थ लॅटिन भाषेतील दुसऱ्या सोप्या शब्दांत किंवा देशी भाषेतील दुसऱ्या एखाद्या शब्दांत तो समजावून घेई. हे अर्थ टिपा म्हणून पुस्तकातील बाजूच्या कोऱ्या जागेवर लिहिले जाऊ लागले. कालांतराने या शब्दांचा अर्थ दुसऱ्यांनाही समजावा म्हणून या टिपा स्वतंत्र कागदावरच लिहिल्या जाऊ लागल्या व त्या शब्दांच्या टिपांच्या याद्यांना स्वतंत्र अशा छोट्या शब्दसंग्रहाचे स्वरूप आले. अशा तऱ्हेने सोळाव्या शतकापर्यंत विद्यार्थ्यांना परकीय भाषेतील शब्दांचे अर्थ समजावेत, हाच अशा शब्दसंग्रहांचा हेतू होता.



इंग्रजी शब्दकोश जसजसे निर्माण होऊ लागले, तसतसा त्यांच्या निर्मितीचा हेतूही बदलला. इ.स. १५०० मध्ये Wynkyn de Worde याने एक लॅटिन - इंग्लिश शब्दकोश छापून प्रसिद्ध केला. शब्दकोशाचे अनेक उद्देश सांगताना शब्दकोशाने लोकांना ज्ञानी व पंडित करून सोडावे, असाही एक उद्देश या शब्दकोशाच्या प्रस्तावनेत लेखकाने सांगितला आहे. शब्दकोशाविषयीची याची कल्पना स्पष्ट होण्यासाठी त्याच्या प्रस्तावनेतील शब्दकोशाच्या नावाचे स्पष्टीकरण करणारा एक उतारा पुढे येत आहे -

"Not unworthily called the garden of words, for just as in gardens are found abundance of flowers, of herbs, and of fruits with which our bodies are strengthened and our spirit refreshed, so in this book are diverse words accommodated to beginners desirous of the pleasers of learning. With these words they may furnished the mind adorn their speech and finally, if the fate permit grow into very learned men." (1)

इंग्रजी भाषेप्रमाणे संस्कृत वाङ्मयाकडे पाहिले असता शब्दकोश निर्मितीची अशीच कारणे घडली असावीत असे आपणास त्या भाषेतील काही प्राचीन कोश पाहिले असता दिसून येईल. भारतात वेदांचा अभ्यास सुरू झाल्यानंतर तो जरी आस्थापूर्वक व परिश्रमपूर्वक होऊ लागला, तरी तो अभ्यास प्रारंभी तरी पुरोहित वर्गातच राहिला. धार्मिक गोष्टींचे प्राबल्य वाढल्यामुळे व प्रत्येक गोष्टीला आधार म्हणून वेदग्रंथ पाहण्याची प्रवृत्ती वाढल्याने वेदातील भागांचा अर्थ सोपा करून त्यावर टिपा लिहिण्याची गरज भासू लागली, वेदांचे उपग्रंथ तयार झाले. 'निघंटू' हा ग्रंथ तयार झाला. थोडक्यात या 'निघंटू'चे स्वरूप शब्दसंग्रहासारखेच आहे. मात्र हा शब्दसंग्रह एकाच वेळी तयार झालेला नसून त्यामध्ये अनेक वेळा भर पडली असावी व त्याला सध्याचे स्वरूप आलेले असावे. या ग्रंथाचे पाच भाग असून निरनिराळ्या अध्यायांत भौतिक वस्तूंची नावे, मनुष्याचे अवयव व युद्ध यांची नावे,

(1) The English Diectionary, De Witt Ji Stannero and Gertrude G. Noyes, P.2

भाववाचक शब्दांचा संग्रह व वेदांतील कठीण शब्दांचा संग्रह आणि निरनिराळ्या देवतांची नावे अशा तऱ्हेचे याचे स्वरूप आहे.

'निघंटू' नंतरचा प्रसिद्ध शब्दकोश अमरसिंह नावाच्या रजपुताने केला असावा. याचे नाव 'नामलिंगानुशासन' असे आहे. यात १५०० श्लोक असून ते अनुष्टुभ छंदात आहेत. याचा काळ सन ५५० हा असावा, अशी समजूत आहे. या अमरकोशाची भाषांतरे अनेक भाषांत झाली. याचे मराठी भाषांतर पंडितांकडून करून घेऊन व्हॅन्स केनेडीने त्याचा आपल्या शब्दकोशासाठी उपयोग केला.

**ब्रिटिश - पूर्वकालीन मराठी शब्दकोशांचे प्रयत्न :-**

ब्रिटिश पूर्वकाळात आपल्या इकडील लेखकांनी व परकियांनी काही शब्दकोश लिहिण्याचे प्रयत्न केले. या शब्दकोशांच्या निर्मितीच्या पाठीमागे सोळाव्या शतकापर्यंत तरी धार्मिक शिक्षण व ज्ञानग्रहण हे दोन उद्देश दिसून येतात. पुढील काळात मात्र शब्दकोश विशिष्ट उद्देशानेच तयार झालेले दिसतात. एक तर भाषेविषयी आस्था निर्माण झाली व देशी भाषेत विपुल ग्रंथनिर्मितीही होऊ लागली. धार्मिक बाबतीतही सुधारणेची चळवळ होऊ लागली. लोकांच्या अंगात देशाभिमानाचे वारे संचारू लागले. लोक परदेशाच्या प्रवासाला जाऊ लागले, व्यापार वाढवू लागले व तेथील शब्दही आणू लागले. पाश्चात्य देशांत, शब्दकोशाच्या वाढीसाठी ही जी कारणे घडली तीच कारणे काही वेगळ्या फरकाने आपल्याकडे घडली. मुसलमानांच्या अमलामुळे धर्मावर, समाजजीवनावर आघात होत होता. मराठीचे फारशीकरण चालू होते. पण जो समाज मुसलमानी दरबारापासून दूर राहिला होता त्याच्या जीवनावर व वाङ्मयावर फारशी भाषेचा फारसा परिणाम झाला नाही. एक दोन शतके, मुसलमानी अमलामुळे लोक दबून गेले होते. तरी पुढे लोकांमध्ये देशाभिमानाची वृत्ती बळावू लागली व याचाच परिणाम भाषेवर होऊन 'राज्यव्यवहारकोश' निर्माण झाला व फारशीच्या जागी संस्कृत शब्द बसविण्याचा प्रयत्न करण्यात आला. मराठ्यांच्या आमदानीत अमरकोशाचे मराठी भाषांतर झालेले एक पुस्तक राजवाडे यांना मिळाले होते, असा उल्लेख सापडतो. याशिवाय आंग्लपूर्वकालीन मराठीत जे शब्दकोश झाले, त्यांचीही माहिती राजवाडे यांनी एके ठिकाणी दिली आहे. ती अशी -

१) महानुभव ग्रंथकारांनी रचलेला मध्यकालीन मराठी शब्दांचा कोश.

२) हेमाद्रि पंडिताने शके ११६० मध्ये केलेला काही संस्कृत शब्दांचा मराठीत अर्थ देणारा कोश.

३) शके १२३९ पर्यंतच्या काळात महाराष्ट्रात यादवांच्या राजवटीत झालेले एक शुद्ध मराठी व संस्कृत - मराठी असे दोन कोश.

४) शके १९३९ नंतरच्या ३०० वर्षांच्या काळात मुसलमानी अंमल दक्षिणेत जारीने चालू असता अनेक यावनी शब्द मराठीत प्रविष्ट झाले होते. त्यांचे अर्थ मराठीत देणारा एक श्लोकबद्ध कोश झाला होता व त्यात विशेषत: जमाखर्च विषयक शब्दांचाच भरणा होता.

५) छत्रपती शिवाजी महाराजांनी तयार करविलेला राजव्यवहारकोश इ.स. १६७५-७६.

६) निजामाच्या दरबारी असलेले पेशव्यांचे वकील व प्रसिद्ध मुत्सद्दी गोविंदराव काळे यांनी युरोपियन लष्करी शब्दांची परिभाषा लिहून ठेवली होती ती.

७) डॉ. विल्यम कॅरे यांचा कोश, इ. स. १८१०.

यानंतरचा कोश व्हॅन्स केनेडी याचा शब्दकोश होय. व्हॅन्स केनेडीचा हा शब्दकोश कुरियर छापखान्यात छापण्यात आला असून तो १८२४ मध्ये प्रसिद्ध करण्यात आला. याचे दोन भाग असून पहिला भाग १२८ पानांचा व दुसरा भाग ९७ पृष्ठांचा आहे. केनेडीच्या या शब्दकोशात फक्त ८ हजार शब्द आहेत. हा शब्दकोश तयार करताना त्याने एका ब्राह्मणाकडून अमरकोशाचे मराठी भाषांतर तयार करून घेतले व शब्दसंग्रहाच्या दोन हस्तलिखित याद्याही

मिळविल्या. तसेच कॅप्टन कोक याने दोन मुन्शींकडून मराठी-हिंदुस्तानी असा एक हस्तलिखित कोश तयार करून घेतला होता, त्याचाही त्याने उपयोग केला. व्हॅन्स केनेडीने ठिकठिकाणी जाऊन मराठी भाषेचा अभ्यास करून व मराठी ग्रंथ अभ्यासून शब्दसंग्रह केला असता तर त्याच्या कोशाचे स्वरूप बदलले असते. पण मराठी ही ग्रंथनिविष्ट भाषा नाही, या कल्पनेने त्याच्या शब्दकोशात अगदी कमी शब्द आहेत. त्याच्या या शब्दकोशात जी प्रमुख उणीव होती ती म्हणजे अगदीच कमी असलेली शब्दसंख्या. त्यामुळेच नवीन शब्दकोशाची गरज भासू लागली व पुढील ५-६ वर्षांतच मराठीत एक नवीन कोश रचिला गेला. हाच मोल्सवर्थचा प्रसिद्ध कोश होय.

मोल्सवर्थचा पहिला मराठी-इंग्रजी शब्दकोश १८३१ मध्ये प्रसिद्ध झाला. याची दुसरी आवृत्ती १८५७ मध्ये निघाली. मोल्सवर्थने आपला शब्दकोश तयार करताना मराठीच्या अभ्यासकांना आपले विचार, भावना, इच्छा व गरजा बोलून दाखविता येतील व मराठी विद्वानांना इंग्रजीतून मराठी पुस्तकांची भाषांतरे करता येतील, असा आपला उद्देश असल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच आवश्यक असणारे असे शब्दच आपल्या शब्दकोशात येणार नसून धार्मिक, नैतिक व विज्ञानविषयक अशा अमूर्त विषयांवरील शब्दसुद्धा आपल्या शब्दकोशात येणार आहोत हेही या शब्दकोशाचे व्यापक स्वरूप सांगताना मोल्सवर्थने म्हटले आहे. त्याने एवढ्या व्यापक दृष्टिकोनातून हा शब्दकोश तयार केल्यामुळेच तो सर्व शब्दकोशांत उत्कृष्ट ठरला. हा शब्दकोश तयार करण्यास त्याला सहा वर्षे लागली. या शब्दकोशाचा विशेष म्हणजे वाढलेली शब्दसंख्या. पहिल्या आवृत्तीत ही शब्दसंख्या ४०,००० होती. दुसऱ्या आवृत्तीत ती ६०,००० झाली. शिवाय या आवृत्तीत डॉ. जॉन विल्सनने मराठी वाङ्मयाचा आढावाही घेतला आहे.

या शब्दकोशाच्या अगोदरच सन १८२९ मध्ये मुंबईच्या शिक्षामंडळींचे काही पंडित यांनी मराठी - मराठी शब्दकोश प्रसिद्ध केला. याचे नाव 'महाराष्ट्र भाषेचा कोश' असे आहे. हा शब्दकोश तयार करण्यात जगन्नाथशास्त्री क्रमवंत, बाळशास्त्री घगवे, गंगाधरशास्त्री फडके, रामचंद्रशास्त्री जान्हवेकर, सखारामशास्त्री जोशी, दाजीशास्त्री शुक्ल व परशुरामपंत गोडबोले या सात पंडितांनी परिश्रम घेतले. या कोशात 'जितका लोकांचा व्यवहार आढळत आला तितक्याचे बुद्धीने आकलन करून' शब्दांची निवड केलेली असून ती मुख्यत: पुण्याच्या आसपासची आहे. देश, कोकण, राजापूर, वाडी इत्यादी प्रदेशांतीलही शब्दांची निवड केलेली आहे. शास्त्रीमंडळाने तयार केलेल्या या शब्दकोशातल्या प्रस्तावनेत मराठी भाषेची व्याख्या, मराठी कोशाची आवश्यकता, शब्दांची व्याप्ती इत्यादी मुद्द्यांची चर्चा आलेली आहे. 'महाराष्ट्र भाषा म्हणजे महाराष्ट्रदेशी राहणारे जे देशस्थ ब्राह्मणादि लोक त्यांची बोलायची प्राकृत भाषा, तिचा कोश म्हणजे त्या भाषेत जे शब्द येतात त्याचा कोश,' याच्या निर्मितीतही मोल्सवर्थचा हात होताच !

यानंतर याच जेम्स मोल्सवर्थने आणखी एका कोशरचनेचे 'इंग्रजी-मराठी' शब्दकोशाचे काम अंगावर घेतले. मेजर कँडी यांना मदतीस घेऊन त्यांनी सन १८३५ पर्यंत बरेच काम केले. पुढे दोघेही आजारी पडल्याने काम बंद पडले. पुढे हे काम सन १८४० मध्ये मेजर कँडी यांनीच स्वत:च्या शिरावर घेऊन हा कोश १८४७ मध्ये पूर्ण केला. मराठी भाषेत त्या काळात अशा रीतीने पंडित मंडळींचा महाराष्ट्र भाषेचा कोश, मोल्सवर्थचा मराठी - इंग्रजी कोश व पुढे कँडीचा इंग्रजी - मराठी शब्दकोश हे तीन महत्त्वाचे शब्दकोश प्रसिद्ध झाले.

यानंतर द्वैभाषिक कोशांची निर्मिती निरनिराळ्या निमित्तांनी होत राहिली. शालेय विद्यार्थ्यांना नित्याच्या अध्ययनास उपयोगी पडावा म्हणून एक 'इंग्लिश आणि मराठी शब्दकोश' कँडीच्या प्रेरणेने श्रीकृष्ण रघुनाथशास्त्री तळेकर यांनी सन १८६१ मध्ये तयार केला. यानंतर खासगी स्वरूपात भिकाजी वासुदेव आठले यांचा 'Marathi-English Dictionary' हा शब्दकोश १८६१ मध्येच

प्रसिद्ध झाला. पुढे सन १८६४ मध्ये 'इंग्रजी आणि मराठी कोश' विष्णू परशुरामशास्त्री पंडित यांनी तयार केला. सन १८६९ साली तयार झालेला बाळकृष्ण मल्हार विडकर यांचा 'रत्नकोश' शालेय मराठी क्रमिक पुस्तकातील शब्दांचे अर्थ देण्यासाठी सिद्ध झाला. अशा शालेय शब्दकोशांचे स्वरूप अंशत: मार्गदर्शिकांसारखेच होते.

### एकभाषिक कोश

द्वैभाषिक शब्दकोशांच्या परंपरेपासून एकभाषिक शब्दकोशाकडे वळले की, शास्त्रीमंडळाच्या 'महाराष्ट्र भाषेच्या कोशा'नंतर नाव ध्यानात येते ते, सन १८६३ साली तयार झालेल्या 'हंसकोशाचे'. रघुनाथ भास्कर गोडबोले यांनी हा कोश विवेकसिंधू, परमामृत, ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, एकनाथी भागवत, रामविजय, वाक्यवृत्ती, मोरोपंत, वामन पंडित यांचे ग्रंथ इत्यादी प्राचीन साहित्य आधारास घेऊन निर्माण केला असल्याने त्या ग्रंथांच्या अध्ययनास याचा फार उपयोग होत राहिला. त्यांनी आपल्या कोशाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे, "हे पुस्तक महाराष्ट्र भाषेच्या किती एक कवितांमधील कठीण शब्दांचा कोश, भांडारामध्ये जसा अमोल व दुर्मिळ संग्राह्य वस्तूंचा संग्रह असतो, तसाच कवितांमधील ज्या शब्दांचा अर्थावबोध झाल्याशिवाय त्या उत्तम प्रकारे लागत नाहीत, अतएव जे कवितांमधील इतर शब्दांहून संग्रहयोग्य, त्यांचा संग्रह यथामती या कोशात केला आहे." या कोशात सुमारे सात हजार शब्द आलेले आहेत.



सन १८७० मध्ये रघुनाथ भास्कर गोडबोले यांनी आणखी एक शब्दकोश 'मराठी भाषेचा नवीन कोश' या नावाने तयार केला. विद्यार्थ्यांना कोश उपयुक्त व्हावा म्हणून 'ज्यांचा नेहमीच्या वापरात उपयोग होत नाही असे फार अवघड जे शास्त्रीय संस्कृत शब्द व ज्यांचा अर्थ सहज मनात येतो असे साधारण शब्द गाळून' हा तयार केला असल्याचे कर्त्यांनी सांगितले आहे. सन १८९१ मध्ये विष्णू रामचंद्र वापट आणि बाळकृष्ण विष्णू पंडित यांनी 'शुद्ध मराठी कोश' या नावाचा एक शब्दकोश तयार केला.

### विसावे शतक

विसाव्या शतकाच्या प्रारंभी मराठीत जी कोशरचना झाली तिचा परिचय करून घेण्यापूर्वी आणखी काही कोशप्रयत्नांचा उल्लेख येथे करणे अगत्याचे आहे. बडोदा येथील सयाजीराव गायकवाड या विद्याप्रेमी राजपुरुषाने आपल्या राज्यात सरकारी व निमसरकारी रीतीने विविध स्वरूपांचे कोश निर्माण करण्यास प्रोत्साहन दिले. पुण्यात सन १९०६ साली भरलेल्या साहित्य संमेलनात मराठी भाषेचा कोश व विश्वकोश यांची निर्मिती व्हावी, म्हणून ठराव झाले. त्यासाठी समितीही नेमण्यात आली. सन १९२७ साली तर मराठी भाषेचा एक सर्वांगीण बृहत्कोश व्हावा व हे काम ज्ञानकोशातील मंडळींनी हाती घ्यावे व महाराष्ट्र साहित्य परिषदेने या कार्यास सर्व प्रकारेच सहाय्य करावे, असा स्पष्ट ठरावही केलेला दिसतो. यातूनच 'महाराष्ट्र शब्दकोश' या सप्तखंडात्मक शब्दकोशाची निर्मिती झाली. पण तिकडे वळण्यापूर्वी आणखी काही आधीच्या प्रयत्नांचा परिचय करून घेऊ.

वासुदेव गोविंद आपटे यांनी आपला मराठी - मराठी शब्दकोश 'मराठी शब्दरत्नाकर' या नावाने सन १९२२ साली प्रसिद्ध केला. सन १९१८ सालापासून त्यांनी या कोशाच्या कामास आरंभ केला. डॉ. भंडारकर, ह. ना. आपटे, गणपतराव आगाशे, विष्णुबुवा जोग, माडगांवकर इत्यादी व्यासंगी लोकांशी विचारविनिमय करून त्यांनी काही संतवाङ्मयही चाळले, आणि सर्वसामान्यपणे सर्वत्र उपयोगी होईल असा एक सुटसुटीत शब्दकोश मराठी भाषे सत्यांच्या प्रयत्नांमुळे मिळाला. आपल्या रचनेच्या हेतूविषयी लिहिताना ते म्हणतात, 'गेल्या शंभर वर्षांत मराठी साहित्याची वाढ निरनिराळ्या अंगांनी करण्याचे प्रयत्न चालले आहेत. काव्ये, नाटके, इतिहास व चरित्र, तत्त्वज्ञान, भाषा, अलंकार, व्याकरण, भौतिकशास्त्र इ. विषयांवर नवी

नवी ग्रंथरचना झाली आहे व होत आहे. ती करताना पुष्कळ वेळा आपले विचार यथार्थरीत्या व्यक्त करण्याच्या कामी समर्पक शब्द शोधून काढण्याची यातायात लेखकांना कमीजास्त मानाने करावी लागते, यात शंका नाही. मराठी भाषेचा आजतागायत संपूर्ण कोश उपलब्ध असता तर आपणास हवा आहे. त्या अर्थाचा एखादा शब्द आपल्या भाषेत अगोदरचा आहे की नाही हे त्यांना पाहता आले असते व असल्यास त्या जुन्या शब्दाचाच उपयोग करून त्यांनी त्या शब्दाला चिरायू केले असते. पण दुर्दैवाने असा कोश उपलब्ध नसल्याने आपण आपल्या कार्यास प्रवृत्त झालो. आपल्या कोशाच्या मर्यादांची यथार्थ जाणीवही त्यांना होती. हे अत्यंत परिश्रमाचे, जबाबदारीचे, दीर्घोद्योगाचे व खर्चाचे काम हाती घेण्यास कोणी तयार होईना. तेव्हा सर्वांगसुंदर व आदर्शभूत कोश राहो, पण निदान मध्यम प्रतीच्या व तात्पुरती गरज भागविणाऱ्या कोशाचा खर्च तरी विद्वज्जनांपुढे मांडावा अशा बुद्धीनेच हे कार्य हाती घेऊन व आपल्या आयुष्यातील सारा व्यासंग व इतिकर्तव्य हेच, अशा दृष्टीने तन-मन-धन त्याकडे लावून हे कार्य आज ८/१० वर्षे केले आहे.' इतकेच म्हणून आपटे थांबत नाहीत तर ते आपल्या कोशाची व्यंगेही देतात. आदर्श कोश कसा असावा, यासंबंधी आपली कल्पनाही ते स्पष्टपणे मांडतात. या शब्दकोशास 'मराठी भाषेची शब्दसंपत्ती' या नावाचा एक विवेचक व उपयुक्त लेख आपटे यांनी जोडलेला आहे. अलीकडे याच्या नव्या आवृत्त्या प्रसिद्ध होतानाही थोडीफार भर नव्या संपादकांनी घातलेली आहे.

'मराठी शब्दरत्नाकर' या कोशाप्रमाणेच नंतरच्या काळात सन १९३० मध्ये विद्याधर वामन भिडे यांनी द्विखंडात्मक 'सरस्वती कोश' तयार केला. हा कोश विस्तृत असून यालाही प्रारंभी 'मराठी भाषेची उत्पत्ती' या नावाचा निबंध जोडलेला आहे. दुसऱ्या खंडाच्या शेवटी वृत्ते व इतर नित्योपयोगी माहिती यांची परिशिष्टे देण्यात आली आहेत. या कोशाचे कार्य मोठे असले तरी शब्दकोशास अधिक रेखीव व शास्त्रशुद्ध स्वरूप दिले तर तो उपयुक्त होण्यासारखा आहे. 'मराठी भाषेची उत्पत्ती' या निबंधातही काही ऐतिहासिक माहितीच्या चुका आहेत. 'जुन्या गद्यपद्यातील अवतरणे, प्रांतिक बोलीतील व धंद्यातील परिभाषा, व्युत्पत्तीची चिकित्सा, अर्थाच्या एकूण एक छटा इ. गोष्टी या कोशात नाममात्रच आहेत.' हा एका कोशकाराचा अभिप्राय यथार्थच आहे.

### महाराष्ट्र शब्दकोश

यानंतरच्या काळात मराठी भाषेस लाभलेला एक विस्तृत व शास्त्रशुद्ध शब्दकोश म्हणजे 'महाराष्ट्र शब्दकोश' (भाग १ ते ७) हा होय. ज्ञानकोशकार केतकरांच्या तालमीत तयार झालेल्या अनुभवी अशा विद्वान संपादकांनी या कामाकडे लक्ष द्यावे, अशा जाहीर सूचनेवरून श्री. य. रा. दाते, चिं. ग. कर्वे, आबा चांदोरकर, चिं.शं. दातार या मंडळींनी सन १९२८ पासून या मोठ्या कामाकडे लक्ष घातले. अनेक संस्था, व्यक्ती यांचे सहाय्य घेण्यात आले. मराठी भाषेत बोलल्या जाणाऱ्या, लिहिल्या जाणाऱ्या बहुतेक सर्व शब्दांची सूची करण्यात आली. आजपर्यंत फक्त पुणेरी भाषेकडेच कोशकारांचे लक्ष होते. परंतु आता या नव्या बृहत् शब्दकोशात माणदेशी, कोल्हापुरी, वायदेशी, नगरी, बागलाणी, खानदेशी, अहिराणी, बालेघाटी, वऱ्हाडी, गंगथडी, बैतुली, नागपुरी इत्यादी मराठीच्या विविध बोलींतील अनेक शब्दांचा संग्रह करण्यात आला. प्रत्येक शब्दाचे व्याकरण, त्याची व्युत्पत्ती, अर्थनिश्चिती, ऐतिहासिक परंपरा इ. बाबतीतही संपादक मंडळ कार्यप्रवृत्त राहिले. मराठी भाषेचा व साहित्याचा इतिहास अवलोकन करून त्यातील निवडक शब्द घेण्याची जरुरी संपादक मंडळाला वाटली. शिलालेख, महानुभावीय साहित्य, मुकुंदराज व ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदासी वाङ्मय, स्फुट अभंगरचना, आर्यवाङ्मय, शाहिरीवाङ्मय, ऐतिहासिक बखरी व कागदपत्रे, निबंधमालाकालीन गद्य, आधुनिक काव्य, निबंध, नाटक, शास्त्रीय ग्रंथ, वृत्तपत्रीय लेख, प्रांतिक बोलींतील वाङ्मय, सोनार, लोहार, कृषी, वाणिज्य इत्यादी धंद्यांतील कारुवाङ्मय, स्त्रीवाङ्मय

इत्यादी विभाग पाडून शब्दांचा समावेश करण्याचे कार्य सुरू झाले. उपलब्ध असलेल्या मराठी - मराठी, मराठी - इंग्रजी, इंग्रजी - मराठी, हिंदी - मराठी, फार्सी - मराठी वगैरे सर्व शब्दकोशांचा उपयोग करण्यात आला. व्युत्पत्तिशास्त्र व व्याकरणशास्त्र यांच्या अभ्यासकांची मदत मिळविण्यात आली. म्हणी व अवतरणे कोठे व किती द्यावयाची, यांची निश्चिती झाली आणि या प्रचंड उद्योगातून डबल क्राऊन आकाराचा ३२३३ पृष्ठांचा सप्तखंडात्मक 'महाराष्ट्र शब्दकोश' तयार झाला. शेवटचा सातवा खंड सन १९३८ साली अभ्यासकांच्या हाती आला. पुढे काही वर्षांनी आणखी एक पुरवणी खंड संपादकांना तयार करावा लागला.

आज तरी मराठी भाषेत एवढा विस्तृत शब्दकोश नाही. सामुदायिक रीतीने काही संस्थानिक व उदार आश्रयदाते यांच्या आर्थिक मदतीवर केवढे मोठे कार्य उभे राहते, याचा नमुना म्हणजे हा शब्दकोश होय. या कार्यातील उणिवांची जाणीव संपादकांना होती. परंतु शब्दकोशाचे कार्य जास्तीत जास्त काटेकोर व शास्त्रशुद्ध करण्याचा प्रयत्न संपादकांनी शेकडो विद्वानांचे सहाय्य घेऊन केलेला आहे. काही नव्या पद्धतींचाही अवलंब केलेला दिसतो. उदाहरणार्थ, शब्दानुक्रम कोणता ठेवायचा हे संपादकांनी भाषाकोविदांकडे प्रश्नावली पाठवून, उत्तरे मागवून निश्चित केले. शब्दांची अनेक रूपे, सामासिक शब्द, शब्दांचे अनेक अर्थ व अर्थछटा, प्रांतिक बोलीतील शब्द, अवतरणे, व्युत्पत्ती, व्याकरण, शब्दांची घडण इत्यादी बाबतीत संपादक विशेष सावधगिरी राखून आहेत असे प्रत्ययास येते. या शब्दकोशाचा आणखी एक महत्त्वाचा विशेष म्हणजे, प्रत्येक विभागास विद्वान संपादकांनी भाषाशास्त्र, व्याकरण व व्युत्पत्ती, कोशरचनाशास्त्र इत्यादी विषयांवर सविस्तर व मूलगामी अशी चर्चा करणारी प्रस्तावना लिहिली आहे. कोशरचनाशास्त्र व कोशवाङ्मय, भाषाशास्त्र व जगातील भाषा, महाराष्ट्र देश, जनता व भाषा, मराठी भाषेचे व्याकरण व शब्दसिद्धी या संशोधनात्मक व विवेचक निबंधांनी कोशाच्या भाषाभ्यासाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

## इतर कोश

मराठी शब्दकोश परंपरेचा आढावा घेत असताना मराठी-मराठी शब्दकोशांवर भर देण्यात आला असला तरी इंग्रजी - मराठीसारख्या द्वैभाषिक शब्दकोशाबरोबर आणखी काही याच प्रकारच्या शब्दकोशांचा निर्देश करणेही अगत्याचे आहे. प्रा. एन्.बी. रानडे यांनी १९०३ ते १९१६ या काळात आपला एक प्रचंड इंग्रजी - मराठी शब्दकोश 'दि ट्वेंटिएथ सेंचुरी इंग्लिश - मराठी डिक्शनरी' या नावाने तयार केला. दोन हजार पृष्ठांच्या शब्दकोशात पाश्चात्य वाङ्मय, शास्त्रीय ग्रंथ, क्रीडा व कायदा, वैद्यक, इंजिनीअरिंग, ऐतिहासिक विषय इत्यादी विविध शाखांचा अभ्यास करून या कोशात शब्दांचा संग्रह करण्यात आला आहे.

असाच आणखी एक महत्त्वाचा कोश म्हणजे, माधव त्र्यंबक पटवर्धन यांचा 'फारसी - मराठी कोश'. हा सन १९२५ साली प्रसिद्ध झालेला शब्दकोश. मराठी भाषेच्या विकासावर फारसी, अरबी भाषांचा परिणाम फार मोठा आहे, हे ध्यानात घेऊन पटवर्धन यांनी ऐतिहासिक कागदपत्रे व बखर वाङ्मय यांतून शब्दांची निवड करून, इष्ट त्याप्रसंगी अवतरणे देऊन अभ्यासकांची मोठीच सोय करून ठेवली आहे.

अलीकडच्या काळातील आणखी दोन-तीन महत्त्वाच्या शब्दकोशांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. कृ. पां. कुलकर्णी यांनी संपादन केलेला 'मराठी व्युत्पत्तिकोश'. याची पहिली आवृत्ती सन १९४६ साली व दुसरी सन १९६४ मध्ये प्रकाशित झाली. मराठी भाषेतील शब्दांचे ऐतिहासिक व तौलनिक दृष्टीने निरीक्षण करून त्यांची व्युत्पत्ती निश्चित करण्याचा प्रयत्न या कोशात केलेला आहे.

नंतरच्या काळात 'सुगम मराठी शब्दकोश' हा भाऊ धर्माधिकारी, श्री. ना. बनहट्टी यांचा शब्दकोश सन १९६८ मध्ये व 'आदर्श मराठी शब्दकोश' हा प्र.न. जोशी यांचा

कोश १९७० मध्ये प्रसिद्ध झाला.

## प्रतिभाषा कोश

नव्या युगमानाचे वर्णन करताना शास्त्रीय, विशेषत: भौतिकशास्त्रीय संशोधनास फार महत्त्व दिले जाते. भौतिकशास्त्राच्या विकासावर आधारलेला आजच्या जीवनास उपयुक्त असाच शिक्षणक्रमही नव्याने तयार होतो आहे. पदार्थ विज्ञान, रसायन, गणित, खगोलशास्त्र, वनस्पतीशास्त्र, खनिजशास्त्र, वैद्यकशास्त्र इत्यादी विविध शास्त्रशाखांचा अभ्यास देशी भाषांतून होतो आहे. यानिमित्ताने विविध प्रकारचे शास्त्रीय परिभाषा कोशही निर्माण होत आहेत. या दृष्टीने य. रा. दाते व चिं. ग. कर्वे यांचा 'शास्त्रीय परिभाषा कोश' हा एक महत्त्वाचा प्रयत्न म्हणता येईल.

स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्र शब्दकोशासारखा सर्व मराठी शब्दांचा समावेश करणारा बृहद्‌कोश असा द.ह. अग्निहोत्री यांचा 'अभिनव मराठी शब्दकोश' व्हीनस प्रकाशन, पुणे (१९८२-८५) यांनी प्रकाशित केला. यातही आरंभी 'आदर्श मराठी शब्दकोश कसा असावा', 'मराठीत शब्दांचे प्रमाणित उच्चार' व 'मराठीच्या प्रमुख बोली व त्यांची उच्चार वैशिष्ट्ये, क्रियापदे व शब्द' या विषयांवर निबंध आहेत. ज्या शब्दांचा उच्चार जसा तो लिहिला जातो तसा होत नाही, अशा शब्दांचा उच्चार कसा करावा, ते इथे दिले आहे. हे या शब्दकोशाचे एक वैशिष्ट्य. या कोशाचे एकूण ५ भाग असून मुद्रित पृष्ठसंख्या अंदाजे १५०० होईल. या कोशामध्ये १९७५ पर्यंतचे शब्द समाविष्ट केले आहेत. ग्रंथालय शास्त्राची परिभाषा, रेल्वे, टपाल खात्याशी संबंधित शब्द, संख्यांची नावे व मूल्ये जसे, परार्ध इ. माहिती दिली आहे.

गेल्या अर्धशतकापासून आपल्याकडे विशिष्ट विषयक शब्दकोशांची निर्मितीही होऊ लागली आहे. परंतु त्यांचे प्रमाण अत्यल्प आहे. एकेका विषयातील संज्ञांच्या व्याख्या, संकल्पना, विकास असा तपशील यात असतो.

याचे उल्लेखनीय उदाहरण म्हणजे, सन १९६२ मध्ये प्रसिद्ध झालेला य. न. केळकर यांचा 'ऐतिहासिक शब्दकोश'. हा शब्दकोश दोन खंडांत आहे. ऐतिहासिक कागदपत्रांच्या अभ्यासाला हा कोश विशेष उपयोगी आहे. एस्. एस्. गोसावी यांचा 'कायदा शब्दकोश' (१९९४), राजेंद्र व्होरा व सुहास पळशीकर यांचा 'राज्यशास्त्र कोश' (१९८७), सरोजिनी बाबर यांचा 'लोकसाहित्य शब्दकोश' ही अशा विशिष्ट शब्दकोशांची काही उदाहरणे आहेत. याशिवाय एक आगळावेगळा असा शब्दकोश व. बा. इनामदार यांनी तयार केलेला व राज्य मराठी विकास संस्थेने प्रकाशित केलेला 'मराठी लघुलेखन शब्दकोश' (१९९६) हा होय.

## अलीकडील कोश

गेल्या पाच-सहा वर्षांतही मराठीमध्ये विविध प्रकारचे कोश प्रसिद्ध झाले आहेत. उदा. प्रा. विनीवाले यांचा 'मराठी-जर्मन कोश' (१९९८), प्रा. धोंगडे यांचा 'इंग्रजी - मराठी कोश' (१९९७), प्रा. तुळपुळे आणि प्रा. अॅन फल्डहाऊस यांचा 'मध्ययुगीन मराठीचा कोश' (२०००), अरुण फडके यांनी संपादित केलेला 'मराठी लेखनकोश' (२००१), मो. वि. भाटवडेकर यांचा 'मराठी पर्यायी शब्दांचा कोश' (२०००), वसंत अवाजी डहाके यांनी संपादित केलेला एक शालेय मराठी कोश, वि. भा. देशपांडे यांनी संपादित केलेला मराठी नाट्यकोश (२०००), जी. आर. भटकळ फाऊंडेशनचा 'संक्षिप्त मराठी वाङ्मयकोश: भाग १' (१९९८) व त्यांचाच 'वाङ्मयीन संज्ञा - संकल्पना कोश' (२००१).

यातील 'महाराष्ट्र शब्दकोश' व 'अभिनव मराठी - मराठी शब्दकोश' यांचा सविस्तर परिचय पुढील भागात करून घेवू. महत्त्वाचा मुद्दा असा, की मराठीतही विपुल कोशवाङ्मय उपलब्ध आहे. पण यांचा प्रत्यक्ष वापर व्हावा, म्हणजे झाले.

•••

# शिक्षण क्षेत्रातील महागाई

*('ज्ञानसाधना महाविद्यालय' आयोजित कोकण विभागीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेतील द्वितीय क्रमांक प्राप्त वक्तृत्व)*

आज स्पर्धेच्या युगात वावरत असताना आपण स्वत:ला शैक्षणिकदृष्ट्या तज्ज्ञ समजत असतो, पण आपण घेतलेले शिक्षण आपल्या गुणवत्तेनुसार मिळाले आहे की, ते पैशाने विकत घेतले आहे, याचा विचार कोण करत नाही, कारण आपल्याला काय करायचे आहे? अशी सर्वांची भावना आहे आणि याच भावनेमुळे भ्रष्टाचार बोकाळलेला आहे. आपल्या देशातील अनेक समस्यांची प्रमुख कारणे दोन आहेत. १) लोकसंख्यावाढ २) भ्रष्टाचार. भ्रष्टाचाराची आपल्याला सवय झाली आहे. त्यात नवीन काही नाही. या बाबतीत आपला देश बराच सुधारलेला आहे. आपण सर्वजण कुठे ना कुठे तरी भ्रष्टाचाराला खतपाणी घालत असतो. शिक्षण हा पैसा कमाविण्याचा धंदा झालेला आहे. आजकाल कोणीही सोम्यागोम्या उठतो आणि शाळा, महाविद्यालये काढतो व खोऱ्याने पैसा ओढतो, याला शासन जितके जबाबदार आहे, तितकेच आपणसुद्धा.

शासनाने प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले आहे, पण माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाबद्दल अशा उपाययोजना केलेल्या नाहीत. खाजगी शाळेत प्रवेशासाठी दहा हजार रुपये डोनेशन घेतले जाते. जी शाळेची बाब तीच महाविद्यालयाची. एस्. एस्. सी. परीक्षेतील गुणवत्ता यादीत झळकलेले विद्यार्थी त्यांच्याकडे गुणवत्ता असूनही प्रवेशासाठी ताटकळत बसतात, तरीही त्यांना त्यांच्या आवडत्या क्षेत्रामध्ये व चांगल्या महाविद्यालयात प्रवेश मिळत नाही. कारण त्यांच्या जागी कमी गुणवंत, पण श्रीमंत वर्गातील विद्यार्थ्यांची वर्णी लागलेली असते आणि ही परिस्थिती जर बदलली नाही, तर श्रीमंत वर्ग अधिक श्रीमंत व गरीब अधिक गरीब होऊन समाजातील श्रीमंत व गरीब ही आर्थिक दरी वाढण्याची दाट शक्यता आहे आणि हे समाजाला फार घातक ठरेल.

बारावीच्या वर्षी साधारण ४०० ते ५०० रुपये शुल्क आकारले जाते, पण त्यानंतर म्हणजेच प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमासाठी ४००० ते ५००० रुपये शुल्क आकारले जाते. यावर शासनाचे नियंत्रण निश्चितच नाही. कारण यातील बरीच महाविद्यालये राजकारण्यांची असतात. तो तर त्यांचा साइड-बिझनेसच आहे. महाराष्ट्र राज्य वैद्यकीय प्रवेश परीक्षेतील गुणवत्ता यादीत २००० व्या क्रमांकावर असलेला विद्यार्थी डॉ. डी.वाय.पाटील वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रवेश परीक्षेतील गुणवत्ता यादीत अव्वल क्रमांकावर झळकतो. ही कोणाची करामत म्हणायची ! तसेच काही महाविद्यालयांत अल्पसंख्याकांसाठी राखीव जागा असताना त्या जागा इतर समाजातील विद्यार्थ्यांना देण्यात आल्या व गरीब समाजातील विद्यार्थ्यांना केराची टोपली दाखवण्यात आली. यावर वृत्तपत्रांतदेखील बातम्या छापून आल्या आहेत, पण शासनाने कुठलीही कारवाई केलेली नाही.

राज्यातील खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना यंदा गणेश चतुर्थीच्या दिवशीच भरमसाट शुल्कवाढीचा प्रसाद मिळालेला आहे. एम्.बी.बी.एस्. अभ्यासक्रम ३ लाख ८० हजार, दंतवैद्यक अभ्यासक्रम - २ लाख ५० हजार, फिजिओथेरेपी / ऑक्युपेशनल थेरेपी अभ्यासक्रम - १ लाख एवढे कमाल शुल्क राज्यातील खाजगी वैद्यकीय, दंतवैद्यकीय आणि फिजिओथेरेपी / ऑक्युपेशनल थेरेपी महाविद्यालयांत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना भरावे लागले आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार एका महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना समान शुल्क आकारले गेल्यामुळे हा प्रश्न निर्माण झाला आहे. प्रत्येक खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांनी प्रत्येक अभ्यासक्रमासाठी जाहीर केलेल्या शुल्कांमध्ये मोठी तफावत असून यंदा वैद्यकीय प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ३ लाख १५ हजार रुपये एवढे कमाल

शुल्क भरावे लागले आहे. कोल्हापूरच्या एका अभियांत्रिकी महाविद्यालयात गेल्या वर्षी ४ लाख रुपये एवढे शुल्क आकारले गेले होते. यंदा त्या महाविद्यालयात ३२ लाख रुपये शुल्क आकारले गेले आहे, म्हणजे जवळजवळ ८ पट शुल्क वाढवलेले आहे. ही सरळसरळ खाजगी महाविद्यालयांची मनमानी आहे अशी शैक्षणिक फी वाढविलेल्या काही खाजगी महाविद्यालयांत शैक्षणिक दर्जाही उत्तम नसतो. विद्यार्थी व त्यांचे पालक एवढी भरमसाट फी भरतात, साहजिकच शिक्षण उच्च दर्जाचे असावे, महाविद्यालयात ग्रंथालय, प्रयोगशाळा चांगल्या दर्जाच्या असाव्यात, एवढीच सामान्य अपेक्षा असते, पण काही महाविद्यालये शिक्षणाचा बाजार करून विद्यार्थ्यांना अक्षरश: लुटतात आणि त्यांना शैक्षणिक सोयी-सुविधेपासून वंचित ठेवतात.

जर शिक्षणाचा बाजार वेळीच बंद केला नाही, तर समाजासाठी उत्तम नागरिक तयार होणार नाहीत, कारण असे खर्चिक शिक्षण घेणारे विद्यार्थी त्यांच शिक्षणासाठी झालेला खर्च वसूल करण्यासाठी सामान्यांना लुटतात, मग ते डॉक्टर बनून इंजिनीयर बनून किंवा एखादा सरकारी अधिकारी बनून, कारण त्यांना पैशाची चटक लागलेली असते. आजकाल गल्लीबोळात क्लासेस झाले आहेत. अनेक आमिषे दाखवून ते क्लासवाले विद्यार्थी व पालकांना आपल्या जाळ्यात ओढतात. क्लासेसशिवाय विद्यार्थी यशस्वीच होऊ शकत नाही, अशी धारणा समाजात निर्माण झाली आहे. त्यामुळे क्लासेसचे फॅड वाढतच चालले आहे, कारण यातील बरेचसे क्लासेस महाविद्यालयीन प्राध्यापकांचे असतात. हे प्राध्यापक ज्या तन्मयतेने क्लासेसमध्ये शिकवितात, त्या तन्मयतेने महाविद्यालयात शिकवत नाहीत. साहजिकच विद्यार्थी क्लासेसकडे वळतात. त्यासाठी महाविद्यालयीन शिक्षणाचा दर्जा उंचावला पाहिजे, पण काही महाविद्यालयांनी शिक्षणाचा बाजार करून विद्यार्थ्यांची साफ निराशा केली आहे. अ.भा.वि.प.ने फी वाढीच्या निषेधार्थ 'कार पुसा' आंदोलन केले आहे. अशीच आंदोलने चालू ठेवून भरमसाट फी आकारणाऱ्या खाजगी महाविद्यालयांविरुद्ध शासनास कडक कारवाई करण्यास भाग पाडले पाहिजे. शिक्षण हा सर्वांचा हक्क आहे आणि तो सर्वांना मिळालाच पाहिजे. शिक्षणक्षेत्रातील महागाईमुळे पालक कर्जबाजारी झाले आहेत आणि विद्यार्थी प्रवेश मिळाला नाही म्हणून आत्महत्या करत आहेत.

शिक्षणासारखे पवित्र क्षेत्र काही बदमाश लोकांनी बदनाम केले आहे, त्याचे पावित्र्य राखण्यात सर्वांनी पुढे आले पाहिजे. शिक्षणाने आपले व्यक्तिमत्त्व सुधारते. शिक्षणातूनच विद्यार्थ्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून दिली जाते, त्यामुळे शिक्षण महागडे नसावे; कारण असे खर्चिक दिवस उगवेल, अशी मला आशा आहे. शिक्षणक्षेत्रातल्या महागाईमुळे एका गरीब विद्यार्थ्याला उच्च शिक्षण घेता आले नाही. त्याची व्यथा मी पुढील ओळींतून मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

*एस्. एस्. सी. परीक्षेत फर्स्ट क्लासने पास झालो*
*मिळेल सायन्सला 'ॲडमिशन' म्हणून भलताच खूश झालो*
*फर्स्ट लिस्टनंतर सेकंड लिस्टपण गेली*
*वेटिंग लिस्टने मला वेटिंग करायला लावली*
*मग मला सारी भानगड कळली*
*ॲडमिशनसाठी नव्हतं लागत फक्त क्वालिफिकेशन*
*मागत होते साले दहा हजार डोनेशन*
*बाबा होते माझे गिरणी कामगार,*
*पण गिरण बंद पडल्यामुळे झाले होते बेकार*
*ते तरी बिचारे आता काय करणार?*
*ॲडमिशनसाठी पैसे भरून उपाशी मरणार ?*
*कॉलेजचे स्वप्न माझे स्वप्नच राहिले,*
*स्वप्नातच मी माझे कॉलेज पूर्ण केले.*

**गोपी रवींद्र भोसले**
प्रथम वर्ष (विज्ञान),
बांदोडकर विज्ञान महाविद्यालय,
ठाणे.

# भ्रष्टाचाराचे समूळ उच्चाटन

भ्रष्टाचाराचे उच्चाटन करण्यासाठी काही उपाय या लेखात मांडले आहेत, हे विचार वाचकांच्या विचारार्थ मुद्दाम देत आहोत. - संपादक

## प्रास्ताविक

"सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी भारताचा स्वातंत्र्यलढा होता. एक नवा समाज घडवण्याचं स्वप्न बाळगलं गेलं होतं. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांचा उद्घोष भारतीय घटनेच्या प्रस्तावनेत केला गेला होता. या प्रस्तावनेची सुरुवात 'आम्ही भारताचे लोक......' अशी आहे. स्वातंत्र्य मिळेपर्यंत 'भारत' नावाचा देश असा नव्हता तसाच 'भारतीय' नावाचा समाजही नव्हता. जाती, धर्म, वर्ग, भाषा, प्रांत यांनी खंडित झालेली ब्रिटिशांच्या राजवटीखालची ती भूमी होती. त्यातून 'भारतीय' नावाची अस्मिता उभी करण्याचं आणि 'भारत' नावाचं राष्ट्र उभं करण्याचं मोठं आव्हान होतं. १३ डिसेंबर १९४६ रोजी घटना समितीसमोर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जे भाषण केलं होतं, त्यात हे आव्हान पेलण्याचा निर्धार व्यक्त केला होता. 'आज आपण राजकीय, सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या दुभंगलेलो असलो, तरी माझी खात्री आहे की, काळ नि परिस्थिती येताच आपल्या एकजुटीला कोणतीही गोष्ट अडथळा निर्माण करू शकणार नाही. जरी जाती आणि पंथ अनेक असले, तरी आपण एक राष्ट्र होऊ, याबाबत माझ्या मनात बिलकूल संदेह नाही. आपल्याबरोबर देशातील सर्व वर्गांना नेण्याची आणि अंती एकी होईल असा मार्ग स्वीकारण्याची आपल्या अंगी ताकद आहे. हे आपल्या वागणुकीनं सर्वांच्या प्रत्ययास आपण आणूया.' आपण 'एक' नाही याची जाणीव आणि आपण 'एक' होऊ, याचा निर्धार या दोन्ही गोष्टी डॉ. आंबेडकरांच्या भाषणात दिसतात."
(योगेंद्र यादव, साप्ताहिक सकाळ / दिवाळी २००१)

भारत स्वतंत्र होऊन पाच दशके लोटली. स्वातंत्र्य चळवळीच्या काळात भारताची लोकसंख्या ४० कोटींच्या आसपास असेल. त्यावेळी लोकसभेचे सदस्य ५४२ होते व आज लोकसंख्या १०० कोटींच्यावर गेली असली तरी ५४२ सदस्यच आताही आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात अनेक पक्ष अनेक कारणांमुळे उदयास आले. अनेकांनी अनेक पक्ष सोडले व नव्या पक्षात प्रवेश केला. यामागे हेतू काय? तर द्वेष व स्वार्थ! कारणे व भाषणे मात्र निव्वळ लोकसेवेच्या तत्त्वांची ! अशा तऱ्हेने कशी तरी जोडणी करून राजकारणाची मोट हाकली जात आहे. प्रत्येक नेता, मग त्याची पार्टी लहान असो वा मोठी असो, मीच देशाचा खरा सेवक आहे म्हणून स्वतःचीच पाठ थोपटून घेत असतो. एकदा निवडून आले म्हणजे मतदार कोण, अशी कोती भावना त्याच्या मनाचा ठाव घेत असते.

## निवडणुकीचे प्रस्थ

("Parliament All set to secure supremacy over Judiciary" Times of India dt. 17.3.2003) :

आता अशी वेळ येऊन ठेपलेली आहे की केंद्रात निवडून आलेले सर्व सदस्य आपले विरोध तात्पुरते बाजूला ठेवून लोकशाहीतील प्रत्यक्ष न्यायदेवतेवरच कुरघोडी करण्याच्या विचारात आहेत. न्यायालयाने जरी असा कायदा मंजूर केला की, निवडणुकीस उभे राहणाऱ्या प्रत्येक उमेदवारास आपली प्राप्ती (संपत्ती सर्वार्थाने), शैक्षणिक पात्रता, स्वतःविरुद्ध कायदेभंग केल्याबद्दल न्यायालयीन खटले आहेत काय, कर्जबाजारीपणा अथवा आर्थिक गुन्हे केले आहेत काय, इत्यादी गोष्टी अगोदर जाहीर केल्या पाहिजेत व हे जाणून घेण्याचा घटनेने मतदारांना बहाल

केलेला सर्वोच्च अधिकार आहे. कारण निवडून येणारे सदस्य हेच पुढे न्यायदेवतेचे रक्षणकर्ते होणार असल्यामुळे व त्याप्रमाणे देशातील जनता जनार्दनाच्या साक्षीने देशाची प्रामाणिक व निस्वार्थ सेवा करण्याची शपथ ग्रहण करणारे असल्याने त्यांची जबाबदारी विशेष मोठी आहे. याबद्दल घटनेतील कलम १४१ व १४२ यांची सखोल जाणीव या संदर्भात लोकसदस्यांना असेलच व असायला हवी.

परंतु लोकसभा अथवा राज्यसभा सदस्यांना हा कायद्याचा बडगा मानवणारा नाही. त्यांच्या मतप्रणालीप्रमाणे हे सर्व जाणून घेण्याची प्रक्रिया निवडून आल्यानंतरच व्हावी. ( म्हणजे नंतर बहुमताने अथवा कायद्याचा किस पाडून अथवा आश्वासनावर आश्वासने देत वेळ मारून नेता येईल असा लोकसदस्यांचा कावा आहे.) कायद्याचे रक्षण करणाऱ्यांनीच जर स्वत: सोयीखातर कायदा धाब्यावर बसवला तर मतदारांना सरळ सरळ सर्वोच्च न्यायालयाकडे धाव घेण्याचा अधिकार घटनेनुसार आहे.

**निवडणूक आयोगाची कार्यकक्षा:**

अ) निवडणूक सुधारणा करावयाच्या असल्यास त्या अगदी मुळापासून करावयास हव्यात. हल्ली कोणत्याही राज्याच्या किंवा केंद्राच्या निवडणुकांच्या वेळी ज्या अधिसूचना जारी केल्या जातात त्या मोघम स्वरूपातच असतात. कायद्याच्या पळवाटा त्यातसुद्धा असू शकतात. 'तारीख बघितली नाही, तुम्ही आला नाहीत, तुम्ही जर अर्ज दिला असेल त्याची पावती दाखवा' इ. कारणे तर सांगतातच, त्याशिवाय असलेली नावे गहाळ करणे व नसलेली नावे घालणे अशा काही क्लृप्त्या निवडणूक अधिकारी घडवू शकतात. हेलपाटे मारण्यास वेळ नसणे अथवा वयोमानाप्रमाणे खेपा घालण्याची शक्ती नसणे, अशा अनेक कारणामुळे मतदार तिकडे फिरकतच नाहीत, अर्ज केल्यास, उत्तर तर सोडाच, पण पावतीसुद्धा मिळण्याची शाश्वती नसते. अशा सुरस गोष्टी वर्तमानपत्रातून वाचावयास मिळतात. प्रस्तुत लेखकाचे निवडणूक ओळखपत्र हरवले म्हणून दुसरी प्रत मिळावी, यासाठी कल्याण विभागातील संबंधित अधिकाऱ्याकडे अनेक खेपा मारूनही पदरी निराशाच पडली!

ब) ज्याप्रमाणे केंद्र शासनात शिक्षण मंत्रालय आहे त्या धर्तीवर निवडणूक मंत्रालय स्थापित करावे, म्हणजे सुशिक्षित व अशिक्षित अशा दोन्ही वर्गात मोडणाऱ्या मतदारांना मत देणे म्हणजे काय? त्याचे महत्त्व किती मोठे आहे, मतावर राजकारण व राज्यव्यवस्था कशी अवलंबून असते, आपण मत दिले तर आपला फायदा अथवा तोटा काय होईल, लोकशाही म्हणजे काय, ती कशी राबवली जाते, मतदात्यांवर करांचा बोजा का व कसा पडतो, त्यावर शासनाचे व आपले जीवन कसे व किती अवलंबून असते, मतपत्रिका कशा व का छापल्या जातात, मतदारयाद्या कशा, केव्हा व कोणत्या वयाच्या मतदारास धरून छापल्या जातात, रेशनकार्ड, घर नंबर, घरातील मतदार किती इ. गोष्टींचे ज्ञान हल्ली उपलब्ध असलेल्या अनेक माध्यमांतून मतदारांना शिकवले गेले पाहिजे. जर मतदार यादीत आपले नाव नसेल तर कोणाकडे जावे व तेथे ते काम त्वरित कसे करून घ्यावे, किती उमेदवार निवडायचे, कोणते निवडायचे, गुन्हेगारी, खुनी लोकांना निवडून न देणे इ. असंख्य गोष्टींचे विस्तृत शिक्षण द्यावे लागते. त्यासाठी ज्याप्रमाणे शिक्षण मंत्रालयाच्या अखत्यारीत प्राथमिक शिक्षणापासून ते थेट उच्च शिक्षणापर्यंत सर्व काही योजना अंतर्भूत असतात त्याप्रमाणे निवडणूक शिक्षणही अगदी प्रथमावस्थेपासून म्हणजे लहान मुलांपासून सुरू करावे. शिकवण्यासाठी उपलब्ध असलेल्या सर्व माध्यमांचा योग्य उपयोग करावा म्हणजे मतदार मत देण्यास सक्षम होतो, व न घाबरता मतदान करू शकतो. यामुळे मतदानात कधीच गोंधळ उत्पन्न होणार नाही व गुंडपुंडांच्या दांडगाईला तो बळी पडणार नाही. लादलेल्या उमेदवाराऐवजी लोकांनीच आपल्या पसंतीनुसार

सुशिक्षित, चारित्र्यवान, कार्यक्षम, तरुण, लोकसेवा करणारा आणि **'सत्यमेव जयते'** हे तंत्र हृदयाशी बाळगणारा उमेदवार उभा करावा व त्यालाच निवडून द्यावे. कुठल्याही अन्य दबावाला बळी पडू नये. थोडक्यात निवडणूक शिक्षण शाळा स्थापल्या म्हणजेच अंतिम साध्य गाठता येईल. सध्या निवडणूक आयोगाला निवडणुकीच्या वेळीच विशेष काम असते. बाकीचा वेळ तो कसा व्यतित करतो, हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे. देशसेवा करणे हे त्याचे पवित्र ध्येय आहे असे आम्ही सर्वजण मानतो, आणि आयोगही तसे नक्कीच मानीत असेल.

क) उगीचच डोकेदुखी व नसत्या कटकटी व गुंतागुंती उत्पन्न करणारा सध्याचा केवळ प्रतिष्ठेचा प्रश्न म्हणजे स्त्रियांना निवडणुकीत किती टक्के स्थान असावे ! स्वातंत्र्योत्तर काळात हा प्रश्न एवढा प्रतिष्ठेचा मानला गेला नव्हता अथवा असला वादच त्यावेळी नव्हता, असा लेखकाचा कयास आहे. एकंदरीत खोलवर विचार केल्यास हा प्रश्नच मुळी पूर्वग्रहदूषित वाटतो. स्त्री समाजास हलके लेखणे ही मुळातच घोडचूक आहे. महिलांमध्ये प्रख्यात डॉक्टर्स, वकील, न्यायाधीश, इंजिनीयर्स, पायलटस्, पोलीस इन्स्पेक्टरर्स, प्रोफेसरर्स, प्रिन्सिपॉल, आर्किटेक्ट, लेखिका, कवयित्री व वक्ते आहेत. जनसामान्यांच्या (त्यात स्त्री व पुरुष असा भेद न धरता) अन्यायाविरुद्ध सामाजिक चळवळ उभी करण्यात श्रीमती मेधा पाटकर, मृणाल गोरे यांच्यासारख्या समर्थ स्त्रिया आहेत. स्त्रियांमध्ये कराटे बहादूरही आहेत. गवई, नाटककार, जागतिक स्तरावर पात्र असे खेळाडूही आहेत. समता, धैर्य, जाणीव, निश्चयीपण, तल्लख बुद्धी, सहाय्यता, बंधुभाव हे सर्व गुण स्त्रियांमध्ये परमेश्वराने ऋजू केले आहेत. उलट पुरुषांमध्ये 'चंचलता' नावाची 'स्त्री' ठामपणे वस्ती करून आहे, याचा विसर कोणालाही पडू नये. मुख्यत: स्त्रीपासून जन्म मिळाला म्हणूनच 'पुरुष' नावाच्या व्यक्तीने जग, त्यातील सुखदु:खे, राजकारण, नेतेगिरी इ. सर्व उपभोगले आहे. संत कबीरदास म्हणतात. **'नारीयों को निन्दो नये नारी नर की खान । जिस नारी से पैदा हुऐ भीष्म, राम हनुमान ॥'** या वचनातील लक्ष्यार्थ तेवढा ग्रहण करून मन मोठे करावे, शब्दांचा कोरडा कीस पाडीत वितंडवाद मात्र माजवू नयेत. कार्यक्षमता, बुद्धी, चातुर्य, प्रसंगावधान, हितकारी भाषण, सेवाभाव, त्यागभावना इ. गुण ईश्वराने मनुष्यप्राण्यास (म्हणजे स्त्रियासुद्धा) दिलेली वरदाने आहेत. तेव्हा स्त्रियांना निवडणुकीत योग्य असे स्थान दिलेच पाहिजे. कोरड्या टक्केवारीवर विसंबून राहू नये. परंपरेची बंधने तोडल्याशिवाय भ्रष्टाचारमुक्त स्वातंत्र्याचा उपभोग कधीच घेता येत नाही.

लोकांना काय? लोक दोन्ही बाजूंनी बोलत असतात. काहीजण म्हणतात, लोकशाही आहे तेव्हा काय हवे ते करा! कोण विचारतो ? काहीजण म्हणतात, ही लोकशाही नसून भ्रष्टाचारी राजवट आहे. यापेक्षा हुकूमशाही परवडली. जाणत्यांनी याचा वरवर विचार न करता हितकारी अर्थ मनी घेऊन पुढे कोणती पावले उचलायला हवीत व शासनास व सामान्य जनतेस त्याचा कसा फायदा होईल, याचा विवेकाने विचार करावा. शांतता व प्रगतीपथावर पुढे जाणारा आपला देश आहे. मुख्य म्हणजे धर्म, भाषा, जाती, उपजाती व लिंग यांचा एकमेकांत असणारा द्वेष व स्वार्थ हेच सामाजिक कुरबुरीचे मुख्य कारण होय. या राक्षसीवृत्तीला प्रथम गाडले पाहिजे. त्यासाठी देश कोणता, नवभारत ! जात कोणती, तर मानव ! धर्म कोणता, तर मानवता (सहिष्णुता) अशी नीती अवलंबिण्याची आज गरज आहे व तशीच समाज शिकवण असावयास हवी. परंपरेच्या बेड्या तोडल्याशिवाय हे कदापिही शक्य नाही. **धर्माच्या संदर्भात अत्यंत महत्त्वाचा असा प्रश्न उपस्थित होतो की, या अष्टधाप्रकृतीच्या प्रत्येक घटकास, जगात आज प्रचलित असलेल्या धर्मांपैकी कोणता विशिष्ट धर्म चिकटविता येईल? परंतु ठळक सत्य हे आहे की, या अष्टधाप्रकृतीच्या कृपेवरच व्यक्तीचे, कुटुंबांचे, राष्ट्राचे, देशाचे व अखिल विश्वाचे जीवन अवलंबून**

आहे. पुढे क्रमाक्रमाने जीवसृष्टी निर्माण झाली व नंतर 'धर्म' कसा व कोठून उत्पन्न झाला याचा ठोस पुरावा कोठेही उपलब्ध नाही. सर्व भारतीय संतांनी, ते कोणत्याही जातीचे अथवा धर्मांचे असोत मानवतेस असा दिव्य संदेश दिला आहे की, 'मानवता धर्म सोडू नका, मनुष्यातच देव आहे जसा तो इतर प्राणिमात्रांतही आहे. नरदेह हा मुक्ती साधण्यासाठी प्राप्त झालेली दुर्मिळ संधी आहे आणि भूतदया हा मानवता धर्मांचा श्रेष्ठ अलंकार आहे.'

आपले जग सर्वार्थाने विलोभनीय आहे व चिरंजीव आहे असे कोणीही मुळीच गृहित धरू नये. ते चांगलेच असेल असे आपण नित्यपणे घेत असलेल्या अनुभवावरून तरी तसे मानता येत नाही. हे जग म्हणजे द्वैताचे कालवलेले मिश्रण आहे. द्वैत-अद्वैत, ज्ञान-अज्ञान, पाप-पुण्य, स्वर्ग-नरक, जन्म-मृत्यू, सत्य-असत्य, धर्म-अधर्म, नीती-अनीति, प्रकाश-अंधार, पवित्र-अपवित्र, विधी-निषेध, शहाणा-मूर्ख, दलित-ललित आणि सुख-दुःख अशा असंख्य द्वैतमयी मिश्रणात कालवलेले हे सारण म्हणजे काळाचे प्रत्यक्ष वैरण आहे. जन्म झाल्यावरोबर प्रथम द्वैताचे अध्ययन करविले जाते आणि त्याबरोबर कर्ता, कर्म, क्रियापद, लिंग, वचन, काळ इ. चे व्याकरणही पढविले जाते. अशा रीतीने द्वैतभावाचे पीक निगा न राखताही झपाट्याने वाढीस लागते. शेवटी या द्वैताच्या आडरानातून बाहेर पडणे महामुश्किलेचे होऊन बसते. येथे प्रचलित शिक्षण व्यवस्थेवर, विद्वानांवर अथवा अन्य कोणत्याही शिक्षण रुढीवर टीका करण्याचा लेखकाचा मुळीच हेतू नाही. शिक्षण नसेल तर सर्वच बाजूंनी अडवणूक होते हे काय सांगावयास हवे? शाश्वत सत्य मात्र हेच आहे की सत्त्व, रज आणि तम हे अदृश्य पण कधीही न विटणारे असे 'विश्व तिरंगा ध्वजाचे' तीन मुख्य रंग आहेत व त्यांच्याच तालावर विश्वाचे सर्व व्यवहार चालत आहेत व चालत राहतील.

वरील सर्व विवेचनाच्या संदर्भात आणि मुख्यतः भारतीय घटनेच्या संदर्भात लेखकास काही गोष्टीचे स्पष्टीकरण करण्यात अतिशय दुःख व मनस्ताप होतो. तो अनेकांना होत असावा, अशी माझी नम्र समजूत आहे. भारतीय स्वातंत्र्यदिनाचा अमृतमहोत्सव असो, कोणताही एखादा उद्घाटन प्रसंग असो, एखाद्या महात्म्याची पुण्यतिथी अथवा जन्मदिन असो, निवडणूक घटना असो, दुष्काळ, पूर, धरणीकंप यासारखे महाभयंकर दुःखद प्रसंग असोत-अशा वेळी त्या त्या प्रसंगी-परिस्थितीनुसार व प्रदेशानुसार वेशभूषा करून सर्वच नेते, सर्वधर्मसमभाव, धर्मनिरपेक्षता, समता, बंधूभाव, देशप्रेम, देशसेवा, देशासाठी महान त्याग, गरिबांचे कल्याण, पोषण, दुःखी, पीडित अथवा मृत झालेल्यांना तातडीची मदत गोळा करून ती वाटण्याची महान आश्वासने देऊन मोकळे होतात. हारतुरे, फोटो हे त्या त्या प्रसंगी झालेच पाहिजेत, याची खास खबरदारी घेतात. प्रसिद्धी माध्यमे तर यातून मुळीच सुटत नहीत. शिवाय जेथे मंत्री किंवा नेते जातील त्यांच्यामागे त्यांची खास सुरक्षा व्यवस्था ठेवण्यासाठी मोठा फौजफाटा व इतर सुखसोयी यांची रेलचेल असते. ही वृथा खर्चिक बाब आहे. हे सर्वजण जाणतातच. घोषित केलेली मदत त्या त्या व्यक्तींना पोहोचते की नाही याची शाश्वती काय ? शिवाय तीच तीच भाषणे व तोच तोच उपदेश ऐकून लोकांचे कान अगदी किटून गेले आहेत. 'बोले तैसा चाले' ही नीती बहुतेक नेत्यांना लागू नसावी कारण भाषणे अथवा वचने तावडतोब बदलण्याची त्यांची अस्सल खासियत असते. दुसरी गंमत म्हणजे, कोणत्याही पक्षास बहुमत नसल्याने पक्षफोडीची किमया साधणे अथवा राजकारणात घोडेबाजार भरविण्याच्या ताकदीचे प्रदर्शन करणे ! याला देशसेवा म्हणावी, की लोकसेवा म्हणावी की अस्सल स्वार्थसेवा म्हणावी ! याचे उत्तर वाचकांनी स्वतःपाशीच हुडकावे.

आजचे जग स्वार्थ, कलह, विध्वंस अशा विनाशकारी उपद्रवांनी ग्रासलेले दिसत असले तरी सूक्ष्म विचारांनी असे कळून येईल की, पंचमहाभूतातील काही घटकांचा काही

अंशीच विज्ञानशास्त्राने उपयोग करून घेतला आहे. पंचमहाभूतावर मात्र स्वामीत्व मिळविलेले नाही! जबरदस्त धरणीकंप, महाभयंकर वादळे, महापूर, दुष्काळ, ज्वालामुखीचे उद्रेक अशा भौतिक आपत्तींवर विज्ञानाने अजून तरी संपूर्ण विजय मिळविलेला नाही. विज्ञानशास्त्रावर टीका करण्याचा यात कसलाही हेतू नाही. उलट विज्ञानाने अथक प्रयत्नांती मानवतेसाठी विपुल सुखसोयी उपलब्ध करून दिल्या आहेत, यात शंका नाही. तथापि विज्ञानशास्त्र ईश्वराधिष्ठानाविना कोरडे पडल्यामुळे विषमता डोके वर काढू लागली आहे. सामर्थ्याहंकार, हडेलहप्पी, आतंकवाद इ. दुष्टवृत्तींचे पीक वाढीस लागले आहे. विज्ञानशास्त्राला या गोष्टी मान्य आहेत, असा गैरसमज कोणीही करून घेऊ नये. विज्ञानशास्त्र हा ज्ञानाचाच एक भाग आहे; तो स्वतः हिंसकवृत्तीचा नसतो. त्याचे ध्येय असते शोधाचे. मानवास दुःख देण्याचे नसते. प्रख्यात विज्ञानशास्त्रज्ञ आइनस्टाइन याला तर अणुशक्ती संहारासाठी वापरली गेली याचे तीव्र दुःख झाले. तो पुढे असे म्हणतो की, 'विश्वातील इलेक्ट्रॉनचे वागणे मनुष्याच्या बुद्धीला कळणे अशक्य आहे. इलेक्ट्रॉनच्या मागे कोणती तरी एक प्रेरकशक्ती आहे, यात शंका नाही.' (अध्यात्म दर्शन - पान १९८ गुरुवर्य के. व्ही. बेलसरे). विज्ञानशास्त्राने अचूकपणे विश्वाचे मूळ सत्य चिरंजीव तत्त्व शोधून काढले तर आहे त्यापेक्षा मानवतेचा अधिक फायदा व कल्याण होईल यात संशय नाही; आणि त्यांच्या या प्रयत्नास अध्यात्मशास्त्राचा मुळीच विरोध नाही. तारतम्यभावाने मायेचा विरोध करणे याव्यतिरिक्त अध्यात्मात विरोध हा शब्द सर्वसाधारणपणे आढळून येत नाही. सरतेशेवटी, ज्यावेळी अध्यात्मशास्त्र, विज्ञानशास्त्र आणि सर्वात मुख्य म्हणजे, राजकारण या तिन्ही शाखांचा मंगलमय त्रिवेणी संगम घडून येईल त्यावेळी विश्वातील अखिल मानवतेला अशा पवित्र व भव्यदिव्य संगमात 'मुक्तिस्थान' घडल्याने अखंड समाधान लाभू शकेल. तिथी, वार, नक्षत्र, काळ, पर्व इ. औपचारिक बंधनांतून मुक्त असलेला हा एक 'महाविश्व कुंभमेळा' असे यथार्थाने म्हणता येईल, असो.

प्रास्ताविक आता आटोपते घेतो, कारण या विषयावर कितीही लिहिले तरी ते थोडेच होईल. राजकारण हे परमार्थाप्रमाणेच एक न उकलणारे कोडे आहे. कारण राजकारण चित्रविचित्र कोडग्यातर्फेच चालविले जाते. लोकांचे, लोकांकरिता, लोकांकडून, हे भारतीय घटनेचे मुख्य सूत्र निवडणुका आटोपल्या की सोयीस्करपणे विसरले जाते. व्यक्तिस्वार्थ व पक्षस्वार्थ साधण्यासाठी, भ्रष्टाचार पचविण्यासाठी आतंकवादाचा जन्म होतो. **भ्रष्टाचार आणि आतंकवाद हे दोन्ही जुळे बंधू आहेत. या दोघांचे मायबाप म्हणजे राजकारण! 'केंद्र सरकारच्या प्रत्येक नोटेवर सत्यमेव जयते!! महाराष्ट्रात मात्र असत्यमेव जयतेचा बोलबाला!!'** (नवाकाळ २१/९/२००२) 'येक शीत चाचपावे । म्हणजे वर्म पडे ठावे ।' या समर्थांच्या उक्तीनुसार नुसत्या महाराष्ट्रातच नव्हे तर केंद्र सरकारच्या अखत्यारीतील सर्व राज्यांतही' 'असत्यमेव जयतेचा बोलबाला' आहे हे सूज्ञ वाचक खात्रीने जाणून घेतील. कारण नोटा केंद्रीय आहेत.' महाराष्ट्राच्या नव्हेत. राजकारणातील गूढ वाटत असलेल्या समस्येचा निर्णय वाचकांनी स्वतःस मानवेल त्या विवेकाने करावयाचा आहे. यात कसलीही जबरदस्ती नाही. 'सत्यमेव जयते' हे एक श्वाश्वत सत्य आहे व सचोटीच्या राजकारणाचा मुख्य आधार स्तंभ आहे. सत्य कधीच असत्य होऊ शकत नाही. जे सत्य स्वयंसिद्ध आहे त्याला सिद्ध करण्यासाठी बहुमताची गरज नसते. सत्य, अहिंसा, भूतदया व निस्सीम देशभक्ती यांची कास धरून परमपूज्य गांधींनी भारताला गुलामगिरीतून मुक्त केले आहे. भारतीय घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर एकसंघ भारत राष्ट्र घडवण्याची घटना भारताला देऊन गेले. अशा या दोन भारतीय महामानवांना आमचे कोटी कोटी प्रणाम!

प्रस्तावना संपविता संपविता एक गोष्ट विशेष बारकाईने सूज्ञ वाचकांच्या ध्यानात आणून द्यावीशी वाटते

व ती म्हणजे, प्रस्तावनेत ठिकठिकाणी आलेला 'अध्यात्म' या संज्ञेचा उल्लेख. अध्यात्म म्हणजे कोणत्याही घटनेच्या मुळापर्यंत विवेकाने शोध घेत जाऊन पोहोचणे. अध्यात्म या शब्दाचा प्रस्तुत लिखाणातील अर्थ म्हणजे निव्वळ भक्ती, भजन, टाळ कुटणे, वैराग्य असाच घेऊ नये. अध्यात्मात लोकहित, नैतिकता, प्रेम, बंधुभाव इ. गोष्टी समाविष्ट आहेत. राजकारणातही या गोष्टी अनुस्यूत असतात. नुसते भजन कुटून देशसेवा, देश संरक्षण व सर्वार्थाने देशप्रपंच हे साध्य होऊ शकत नाही. हे सांगावयास नकोच. महात्मा गांधींनी त्यांच्या काळात, जी भयानक सामाजिक स्थिती होती, तिच्याशी समर्थपणे टक्कर देऊन देशासाठी अनेक कष्ट, हालअपेष्टा सोसून स्वतःचे बलिदान केले. हे आजच्या युगातील आध्यात्मिक, राजकीय, सामाजिक चळवळीचे एक ज्वलंत उदाहरण आहे.

**भ्रष्टाचाराच्या समूळ उच्चाटनासाठी, देशाच्या प्रस्तुत राजकीय परिस्थितीच्या संदर्भात, मला उमगलेले काही ठोस उपाय :**

देशातील राजकीय, सामजिक आणि आर्थिक परिस्थितीचे सिंहावलोकन केले असता असे आढळून येईल की, देशातील केंद्राची किंवा राज्यांची आजची शासन व्यवस्था जनसामान्यांस न रुचणारी आहे. नेत्यांनी कितीही तोंड पिटले तरी जनतेची अशी धारणा झाली आहे की, नुसत्या उदात्त तत्त्वांचा उच्चार करून देशहित कधीही साध्य होत नसते. त्याप्रमाणे आचरण हवे. निवडणुकीत कोणत्याही एका पक्षाला बहुमत मिळत नाही व त्यानंतर पक्षफोडीचे तंत्र, घोडेबाजार इ. चा अवलंब करून कसेबसे सरकार सत्तेवर येते; त्यानंतर मंत्रीपदे व अधिकार यासाठी सत्ताधारी पक्षात कुरबुरी सुरू असतात आणि कोणाचे समाधान करावे व कोणाला डावलावे, अशा कोंडीत सत्ताधारी पक्ष सापडलेला असतो. त्यात भरीस भर म्हणून की काय, विरोधी पक्षातील अनेक गट एकत्र येऊन सत्ताधारी पक्षासच खाली खेचून सत्ता काबीज करण्याच्या प्रयत्नात गर्क असतात. हे नेहमीचेच नाटक आहे. मतदारांनी आपल्याला निवडून दिलेले आहे. त्यांची सेवा करावी, याची साधी जाणीवही पक्षनेत्यांना रहात नाही. ही अत्यंत निराशाजनक बाब आहे. यामुळे दर निवडणुकीत मतांचे प्रमाण घटत चालले आहे, यात शंका नाही. मताधिक्य नसले तरीसुद्धा सत्ताधारी आणि विरोधी पक्ष मिळून जनतेची सेवा करू शकतात. हे सत्य सर्वांना कळते, पण वळत नाही. द्वेष व केवळ सत्तास्वार्थ साधणे यासाठीच पक्षापक्षांमध्ये रस्सीखेच सुरू असते.

संपत्ती वाटपात समानता प्रस्थापित करण्यासाठी झटणे, आर्थिक विषमता नष्ट करणे, अशिक्षित व दरिद्री लोकांच्या पोटापाण्याची व्यवस्था राबवणे, भांडवलदारांनी गरीब कामगारांची पिळवणूक करू नये व त्यांना गुलामासारखे वागवू नये. व्यक्तीस्वातंत्र्य व सामाजिक विकास हे एकमेकांशी निगडीत आहेत याची जाणीव ठेवून एकात्मता साधणे, लोकशाहीचे उत्तम शासन कसे असते हे उत्तम राजकारण करून जनसामान्यांस पटवून देणे, अशा अनेक बाबी आहेत की ज्यांच्या उणिवांमुळे देशातील जनता अतिशय उद्विग्न झाली आहे. केंद्रात काय किंवा राज्यात काय रोजची भांडणे, चारित्र्यहनन, कामकाज बंद पाडून जनता भरत असलेल्या करांची अशाप्रकारे उधळपट्टी करणे, संप, बंद पुकारण्यास प्रोत्साहन देणे, जातीय दंगल कोणत्या तरी क्षुल्लक कारणावरून घडवणे व त्याचे खापर दुसऱ्याच्या माथ्यावर फोडणे, असल्या राजकीय वृत्तीस यशस्वी लोकशाही असे म्हणताच येणार नाही. देशातील जनतेची याप्रमाणे होणारी प्रतारणा म्हणजे पुढे येणाऱ्या लोकशाही क्रांतीची पावलेच आहेत. याला लोक जबाबदार नसून शासनच पूर्णपणे जबाबदार आहे; याचाच अर्थ लोकशाही क्रांतीचा जन्म होणार आहे. लोकशाही क्रांती म्हणजे मत पेट्यांतून होणारी क्रांती, मताधिकार व मतदान व्यवस्था चोख असली म्हणजे शांततामय क्रांती होऊ शकते आणि यासाठी शासन, सामाजिक नेते व कार्यकर्ते यांची प्रामाणिक साथ हवी. मतपत्रिका पळवणे, गुंडांच्या साथीने खोटे मतदान

करवणे, जाळपोळ करणे, मतदारांना बाहेर पडू न देणे हे सर्व लोकशाहीचे लक्षण नव्हेच. हिटलर, मुसोलिनी, लेनिन, माऊत्से तुंग यांनी घडविलेल्या रक्तरंजित क्रांतीचा संदर्भ आपल्या लोकशाही क्रांतीशी मुळीच नाही. हे येथे मुद्दाम नमूद करतो. आपल्या समाजाची घडी हडेलहप्पी करून बदलावी असे कुणाचेच ध्येय नाही. " India's problem - the dishonest, compromising politicians : They batray the voters." (The Free Press Journal Dt. 28/10/2002) या दैनिकातील अग्रलेखाचा मथळा अत्यंत बोलका आहे. महात्मा गांधींच्या निर्वाणानंतर पंडित जवाहरलाल नेहरू कसे बदलत गेले, सरदार पटेलांच्या मृत्यूनंतर Planning & permit-quota- licence-raj कसे सुरू झाले, इत्यादी माहिती यात आहे. हा अग्रलेख फार मोठा असल्याकारणाने त्यातील सर्व गोष्टींचा उल्लेख येथे करता येणार नाही.

**मतदारराजाला आपला हक्क बजावण्याची सुवर्ण संधी:**

केंद्रात व राज्यात सध्या पुढील येणाऱ्या निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहेत व त्याप्रमाणे मतदारांना विविध सवलती देण्याचे आश्वासन देऊन त्यांना खूश ठेवण्याचा खटाटोप प्रत्येक पक्ष करीत आहे. एकगठ्ठा मते कशी प्राप्त होऊ शकतील, या विचारात सर्वच पक्ष गर्क असून त्याप्रमाणे निरनिराळ्या योजना व युक्त्या शोधून काढीत आहेत. नेते दोन डोळ्यांनीच बघत असतात. परंतु जनता मात्र त्यांना कोट्यवधी डोळ्यांनी पहात असते व नेता कसा असावा याचा निष्कर्षही काढू शकते. परंतु दहशती पुढे कोणाचे काहीच चालत नाही. उमेदवार कसा आहे, त्याचे चारित्र्य कलंकित आहे काय, त्याला गुन्हेगारीची शिक्षा झाली आहे काय, लोकसेवा त्याने आतापर्यंत कशी केली आहे , त्याची प्रामाणिकता, वयाची मर्यादा, बुद्धीची क्षमता, शैक्षणिक पात्रता, त्याचे एकंदरीत वैयक्तीक चारित्र्य इ. अनेक गोष्टी जाणून घेण्याचा मतदाराचा हक्क आहे. व नेमक्या याच गोष्टी लोकसभेस नको आहेत. म्हणून एकूण कायदेप्रणालीवरच मात करण्याचा खटाटोप लोकसभा सदस्य करीत आहेत. जे अनेक पक्ष आहेत, त्यांची मुख्य धारणा अशी आहे की पक्षच तेवढा श्रेष्ठ ! व्यक्तीस्वातंत्र्याला अजिबात किंमत नाही. माझा स्वतःचा दृष्टिकोन असा आहे की जनसामान्यामध्ये अशा विपुल व्यक्ती आहेत की, ज्या स्वार्थत्यागी आहेत, सुशिक्षित आहेत, ज्यांना घटनेची सर्व तऱ्हेची जाणकारी आहे; ज्यांच्यात हुशार असे कायदेपंडित आहेत, शास्त्रज्ञ आहेत, तंत्रज्ञ आहेत, ज्यांना सामान्य जनतेबद्दल आदर, कणव आहे, जे प्रामाणिक लोकसेवा, देशसेवा अव्याहतपणे करू शकतील, जे भारत राष्ट्र एकसंघ राखू शकतील, जे उत्तम शासनकर्ते आहेत, देश संरक्षण, उत्पादन, आर्थिक धोरण यांचे ज्यांना पुरेपूर ज्ञान आहे, जे पैसा, कपडा, मकान, पाणी व शिक्षण इ. चा जनतेस समानतेने व सहृदयतेने लाभ व्हावा, यासाठी कर्तव्यदक्ष असतील थोडक्यात म्हणजे सध्याच्या पक्षांकित असलेल्या शासन व्यवस्थेपेक्षा उत्तम रीतीने सर्व प्रश्न सोडवण्यात क्षमता असलेले नागरिक विपुलतेने उपलब्ध आहेत. अशा लोकांना उमेदवार म्हणून उभे करून निर्धाराने त्यांनाच निवडून देण्याचा मतदारास खात्रीने हक्क आहे व त्यांनी तो बिनधास्तपणे बजावावा. मतदारांचा असा पक्का निश्चय 'हितकारक शासन यंत्रणा' निर्माण करू शकेल यात शंका नाही. पक्षनेत्यांच्या हुकूमशाहीस चोख उत्तर 'लोकमतच' देऊ शकते व यासाठी निवडणूक शिक्षण संस्थेची नितांत गरज आहे. सामान्य जनता यात उत्स्फूर्तपणे भाग घेऊन शासनास आपलेपणाने हवी ती मदत करू शकेल.

भ्रष्टाचाराची अनेक उदाहरणे आपण वाचत किंवा ऐकत असतो. पोलिस खाते जे जनतेचे रक्षक आहे तेच भ्रष्टाचारामुळे भक्षक बनलेले आहे, याबद्दलही आपण दैनिकांतून वाचलेले आहे. आपण कारगिल किंवा इतर अनेक लढाया जिंकू शकतो. परंतु वीरप्पनसारख्या चंदन तस्कराला मात्र अनेक वर्षेसुद्धा पकडू शकत नाही. हे शासनास भूषणावह आहे का? जनतेच्या पिण्याचा पाण्याचा

प्रश्न आणि शेतकऱ्यांच्या शेतजमिनीस व्यवस्थितपणे पाणीपुरवठा करण्याचा प्रश्न आपण स्वातंत्र्योत्तर काळापासून आजपर्यंत सोडवू शकलो नाही, हे एक विदारक सत्य आहे. कालव्याची हार योजना (Garland Canal Scheme, 1970-Times of India-Dt. 12.6.03) ही बारगळली आहे. नद्या एकमेकांशी जोडण्याचा प्रकल्पही धूळ खात पडला आहे. हिमालयातून वर्षानुवर्षे अथवा युगानयुगे वाहणाऱ्या अनेक नद्यांमुळे हिमालय पर्वत काही लहान झालेला नाही. हिमालय ही निसर्गनिर्मिती आहे, मानव निर्मिती नव्हे. नद्या काही अंतराळातून वाहत नाहीत. कुणाच्या शेतातून, हक्काच्या जमिनीतून, बागांतून, घराच्या जागेवरून त्या नक्कीच गेलेल्या असणार. त्याबाबत कुरबूर का ? बरे, नद्यांचे पाणी वळवले नाही तर भयंकर येणाऱ्या पुरामुळे अब्जावधीचे नुक्सान होते हे आपण नेहमीच पाहतो, मग नद्या वळवण्याबद्दल उगाच कुरबूर का ? सह्याद्रीचे पठार उंच आहे, त्यामुळे दक्षिण भारतात नद्यांचे पाणी वाचवता येणार नाही, असा एक पारंपरिक विचार दृढमूल होऊन बसला आहे. लालफितीचा पगडा हे त्याचे मुख्य कारण आहे.

आता दुसरे चित्र पहा. अरब देशांतून किंवा इराणमधून समुद्राच्या खोलीतून पाइपलाइन टाकून भारतात गॅसपुरवठा करण्याचे घाटत आहे. ते कुठपर्यंत आले व त्याचे काय झाले हे शासनालाच काय ते माहीत. मग शासन असा का विचार करीत नाही की सह्याद्रीच्या दख्खन पठारापेक्षा हिमालय कितीतरी उंचआहे. तेव्हा हिमालयात अशी काही मोक्याची ठिकाणे निश्चित करून तेथून मोठ्या पाइपलाइन टाकून दक्षिणेस पाणीपुरवठा का करता येऊ नये. परदेशातून समुद्राखालून पाइपलाइन टाकून भारतात गॅस आणायच्या योजनेपेक्षा आपल्या देशात हिमालयात पाइपलाइन बसवून दक्षिणेस पाणी पुरवण्याची किफायतशीर योजना अमलात आणता येणार नाही का ? शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, अभियंते व आपले शासनकर्ते यांनी परंपरेच्या येड्या व दिरंगाई यांना झटकून या योजनेचा विचार केला तर देशाचा सर्वार्थाने फायदा होईल. अवर्षणग्रस्त प्रदेशास पाणी हे पुरवलेच पाहिजे. हिमालय हा सर्व देशाचा आहे. त्यावर कोणाच्या मक्तेदारीचा हक्क सांगता येणार नाही. दुसरे असे की वर्फाच्छादित केंद्रापासून जर (म्हणजे पुष्कळ उंचीवरून) पाण्याचा स्रोत वाहू लागला तर त्यात गाळ अत्यंत कमी प्रमाणात येईल अथवा येणार नाही. साधकबाधक विचाराअंती हा प्रश्न सुटू शकतो. योजना आखणे व तडीस नेणे हे शासनाचे, अभियंत्याचे व तंत्रज्ञाचे काम आहे. एकंदरीत भारतातील पाण्याचे दुर्भिक्ष हटवण्याचा शासनाचा निर्धार असावयास हवा इतकेच ! अनेक योजनांसाठी जागतिक बँकेकडून कर्जे घेतली जातात. त्यात या योजनेचा समावेश करून सर्व जनतेचे 'जलहित' साधावे हे काय सांगावयास हवे ? आपले केंद्र शासन काय किंवा राज्य शासन काय, त्यातील प्रतिष्ठित अधिकाऱ्यांना कटकटी, डोकेदुखी उत्पन्न झाली म्हणजे येनकेन प्रकारेण अधिकाऱ्यांच्या तावडतोब बदल्या करून टाकायच्या किंवा त्यांना त्रास देऊन राजीनामा देण्यास भाग पाडावयाचे अथवा कोणती तरी कारणे देऊन त्यांची हकालपट्टी करावयाची अशी जणू काय वहिवाटच झालेली आहे. शासनाच्या असल्या क्षुद्रवृत्तीमुळे अनेक उत्तम अधिकाऱ्यांच्या आयुष्याचे मातेरे झाले आहे. याची जनतेस प्रखर जाणीव आहे व शासनास तर नक्कीच असेलच. ही काय शासकीय कारभाराची पद्धत झाली?

आर्थिक विषमता, मनमानी कारभार, त्यातच भ्रष्टाचार व हडेलहप्पी या सर्व कारणांमुळे नक्षलवादी, पीपल्स वॉर ग्रुप, अब्दुल करीम तेलगी, वीरप्पन प्रकरण अशा आतंकवादी प्रवृत्ती डोके वर काढू लागतात व साहजिकच समाजस्वास्थ्य तर बिघडतेच शिवाय शासनालाही अशा समस्यांना समर्थपणे तोंड देणे मुश्किलीचे होऊन बसते, कारण ते भ्रष्टाचारामुळे सडून शक्तिहीन झालेले असते. आर्थिक विषमता ही शासनाच्या अनाठायी खर्चिक वृत्तीमुळे उत्पन्न होते. शासनाचे जीवन चालते फक्त करवसुलीवर.

विषमतेव्यतिरिक्त शासन खुद्द कसलेही उत्पादन करीत नसते. फक्त मनमानी खर्च करणे एवढेच त्यांच्या अखत्यारीत असते. शासकीय वाहने, त्यांचा गैरवापर, बारीकसारीक कारणांसाठी परदेशी वाऱ्या करणे, निवासांची लाखो रुपयांची देणी थकविणे, टेलिफोन, विजेची बिले थकविणे, वाटेल त्याला वाटेल ती आर्थिक मदत देणे, नातेवाईकांची सरबराई करणे, हॉटेल्स, रिसॉर्टस वगैरे बांधणे, परदेशात पैसा साठवणे, वशिलेबाजीने अव्वाच्या सव्वा नोकरभरती करणे, पगारवाढ , बोनस इ. फंदात स्वतःला गुंतवून घेणे शेवटी शासनाला खर्चाच्या बोज्यातून वाचवण्यासाठी बँकांकडून उचल घेणे आणि यातून हमी देऊन ही कारखान्यांना दिलेली कर्जे बुडली तरी तिकडे दुर्लक्ष करणे इ. अनेक अशा बाबी आहेत की, ज्यामुळे शासनाची अर्थव्यवस्था पार कोलमडून जाते. पण दारूचे परवाने, सोशल क्लबजुना परवाने, परमिट रूम-बार याना परवाने हे सर्व मार्ग उत्पन्नवाढीसाठी अवलंबावे लागतात. कारण पगार व बोनस देण्यासाठी शासनाकडे खडखडाट असतो. राजकीय नेत्यांच्या सूतगिरण्यांना राज्य सरकारने हमी देऊनही ८१ कोटी ६७ लाख रुपयांचे कर्ज या सूतगिरण्यांनी न फेडल्यामुळे राज्य सरकारच्या पुण्यातील तीन सरकारी इमारतींवर जप्ती आली आहे. तसेच रिझर्व बँकेतील आणि स्टेट बँक ऑफ इंडियातील खाती गोठवण्यात आली आहेत. (नवाकाळ: २९.५.२००३.)

नावाला दारूबंदी पण दारूची रेलचेल मात्र सगळीकडे! सूज्ञ वाचकांनी आणि सूज्ञ शासकांनी दारू पिण्यामुळे देशाचे कोणते मोठे कल्याण साधले आहे, याचे स्पष्ट उत्तर द्यावे. महात्मा गांधींची स्वातंत्र्य चळवळ सुरू असताना रोज पहाटे प्रभातफेऱ्या निघायच्या. त्यात मीही सामील असायचो. त्यावेळच्या प्रभात फेरीतील एका गीताची ओळ मला प्रकर्षाने आठवते : ती ओळ अशी - ''या दारूने संसाराची माती । जाहली कितीकांची ती ।'' परंतु दुर्दैवाने आतले समीकरण असे आहे की संसाराची माती झाली तरी चालेल, पण दारू ही पाहिजेच ! आणि हा कारभार बघून मन अतिशय विषण्ण होते. आता याला भ्रष्टाचार म्हणावा की शासनाची आचारभ्रष्टता म्हणावी? 'लोकसत्ता' दिनांक १९ ऑगस्ट २००१ मध्ये 'महसूल वाढीसाठी वेश्यालये का सुरू करीत नाही ? न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी यांचा राज्य सरकारला खरमरीत सवाल' असा मथळा वाचला. राज्याच्या तिजोरीत भर पडावी, यासाठी दारूच्या नव्या दुकानांना परवाने देण्याच्या राज्य सरकारच्या प्रस्तावाच्या संदर्भात न्यायमूर्ती धर्माधिकारींनी केलेला हा भेदक सवाल आहे. ते पुढे म्हणतात की 'दारूचा व्यापार हा गरिबी कधीच संपू नये यासाठी भांडवलशाही समाजरचनेने रचलेला व्यापक कट आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून कायदे असूनही चोरी, दरोडे होतच आहेत. भ्रष्टाचारही होतच आहे. म्हणून तो कायदेशीर करून त्यासंबंधीचा कायदा रद्द करायचा का, असा बोचरा सवाल करून, 'रोग बरा करण्याऐवजी रोग्याला मारण्याचीच भाषा करू नका' असे आवाहनही या पत्रात त्यांनी केले आहे.' यावरून शासनाची अर्थव्यवस्था किती विस्कळीत झाली आहे याची जाणीव वाचकांना आलेलीच असेल. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचा कारभार पाहिला तरी तोच अनुभव सगळीकडे दिसतो. ग्राहक भारनियमनामुळे संत्रस्त झाले आहेत. मंडळातील स्थानिक अधिकाऱ्यांच्या मनमानीमुळे केव्हाही आणि अमर्याद काळासाठी भारनियमन मात्र नागरिकांच्या प्रक्षोभाचा विषय ठरते. (म.टा. २५-१०-२००२.) सामान्य माणसासमोर उभ्या ठाकलेल्या अनेक समस्यांची प्रभावी तड लावणे यासाठी अतिव्यापक लोक चळवळ उभी करणे हे देशातील जनतेपुढे एक मोठे आव्हान आहे. नाही तर अतिश्रीमंत व अतिदरिद्री यांच्यामधील दरी कधीच कमी होणार नाही. श्रीमंतांची श्रीमंती लुबाडली जावी असा याचा अर्थ नसून गरीब मात्र गरिबीच्या पिढीजात गुलामगिरीत पिचत पडू नये एवढाच या सांगण्याचा मथितार्थ.

एक शीत चाचपून पाहिले म्हणजे सगळा भात पूर्णपणे

शिजला आहे की नाही याची खात्री पटते. त्याप्रमाणेच केंद्र-राज्य शासन यांच्या राज्यकारभारात कोणत्या उणिवा अथवा कमजोरी आहे याची कल्पना वर स्पष्ट केलेल्या काही उदाहरणांवरून नक्कीच आली असेल.

**समूळ भ्रष्टाचार निर्मूलन व सामाजिक संतुलन राखण्यासाठी कठोर व आर्थिक पथ्य व नैतिकता यांची जरुरी :**

येथे प्रारंभीच असे स्पष्ट करावयाचे आहे, की या लेखात मांडलेले विचार, मते किंवा उपाय ही सर्व ग्राह्य धरावीत असा लेखकाचा मुळीच आग्रह नाही. तारतम्य भावाने यांचा साधकबाधक व सर्वांगीण विचार करून आपल्या अंतर्यामी काय पटते ते स्पष्टपणे व निर्भीडपणे जनतेसमोर मांडावे व त्याप्रमाणे पटवून द्यावे म्हणजे सर्वार्थाने उत्तम शासन आरूढ होऊन जनसामान्यांच्या हिताचा सुवर्णमध्य गाठता येईल. देशप्रेम, देशासाठी स्वार्थत्याग, उद्योग व कष्ट करण्याची प्रवृत्ती, आपला देश सर्वार्थाने समृद्ध होऊन जागतिक स्तरावर त्याची झपाट्याने प्रगती व्हावी यासाठी प्रामाणिकपणाचा स्वार्थत्याग व कष्ट उठविण्याची जिद्द हे सर्व गुण भारतीयांत खोलपणे रुजवण्याची जरुरी आहे. व त्यासाठी योग्य असे शासन व सचोटीचे कार्यकर्ते यांची बहुमोल गरज आहे. आपल्या डोळ्यासमोर जर्मनी, जपान यासारखे देश गेल्या महायुद्धात कसे बेचिराख झाले होते व आता ते जागतिक स्तरावर किती प्रगत राष्ट्रे झाली आहेत याची ठळक उदाहरणे आहेत. राष्ट्राभिमान व राष्ट्रीयत्व यासाठी त्यांनी केलेला त्याग व उठविलेले कष्ट हेच याचे ईंगित आहे. त्या देशात उणिवा नाहीत असे नाही. काही प्रमाणात आहेतच. तरी पुढारलेल्या राष्ट्रांत त्यांची गणना आज होत आहे. भारतातही यांत्रिक, तांत्रिक, विज्ञान व देश संरक्षण विभाग यात पुष्कळच सुधारणा झाली आहे, नाही असे नाही. परंतु या देशातील पारंपरिक, संकुचित वृत्ती, जातीय वेबनाव, दारिद्र्याची रेलचेल, विविध तऱ्हेची प्रदूषणे, अखंडत्वाने भारतीय असूनही संधीसाधूवृत्तीमुळे त्यात ठळकपणे दिसणारी फुटीरता इत्यादी अनेक कारणांमुळे भारताकडे क्षुद्र वृत्तीने पाहण्याचा पाश्चिमात्यांचा दृष्टिकोन आहे. किंवा असेही असू शकते की, भारत सामर्थ्यशाली राष्ट्र बनू नये यासाठी अनेक पारंपरिक कटकटी करून भारताला त्यातच गुंतवून ठेवून परावलंबित्व पत्करावयास लावणे ! कुणाचाही कुठलाही इरादा ओळखण्याची चाणाक्षता मात्र आपल्यात हवी.

आता पाश्चिमात्य आधुनिकीकरणाकडे भारताचे डोळे लागले आहेत. आपले भारतीयत्व जर गमवायचे नसेल तर तरुण पिढीने भारतीयत्वाला साक्षी ठेवून अन्य देशातील ज्ञानार्जन करणे यात काहीच गैर नाही. परंतु पाश्चिमात्य संस्कृतीचे अनुकरण करून त्यास बळी पडणे हा 'भारतीयत्व' तत्त्वाहंकाराचा ठिकऱ्या उडवू शकतो. आपला भारत सर्वच बाबतीत सशक्त, सुशील व सुदृढ अशा मार्गावर आणावयाचा असेल, आणि वरपासून खालपर्यंत सर्वांचेच जर मजबूत असे एकमत असेल तर सध्याच्या शासकीय यंत्रणेस व्यवस्थेत आमूलाग्र कडक अशी अर्थपथ्ये पाळावी लागतील. तरच भारताचे नाव जागतिक स्तरावर सुवर्णाक्षरांमध्ये झळकू शकेल.

**वरील संकल्पनांचे पृथ:करण येणे प्रमाणे :**

१) **निवडणुका :** भारतात लोकशाही आहे व लोकशाहीचा कणा म्हणजे निर्भय अशा मोकळ्या वातावरणात निवडणुका, अनेक कारणांमुळे मोकळ्या वातावरणात आपल्या देशातील निवडणुका होतातच याची शंभर टक्के खात्री देता येणार नाही. मतदारांच्या याद्या संपूर्णपणे बरोबर आहेत याची शाश्वती नाही, असलेली नावे गाळली जातात व नसलेली घातली जातात. सुशिक्षित मतदारांना फारशी किंमत नसते, कारण सुशिक्षित अल्प व अशिक्षित अज्ञानी जास्त असे सध्याचे व्यस्त समीकरण आहे, व अशा निरक्षर व अज्ञानी लोकांची एकगठ्ठा मते (Vote Bank) सांभाळण्यात राजकीय नेते तरबेज असतात.

ज्या पक्षाचे प्रावल्य जास्त तो पक्ष दारू, पैसा, धाकदपटशा यांच्या जोरावर जास्त मते मिळवू शकतो. काही वेळेस तर मतदान कक्ष (Poling Booth) गुंडांच्या करवी काबीज करून सुशिक्षित अशा लोकांना मतदानही करू दिले जात नाही. गुंडांचे प्रावल्य शासन व पक्षनेते हमखास आवरू शकतात, पण त्यांना ते एकापरीने नकोच असते. ज्या पवित्र लोकशाहीचा आपण एवढा उदो उदो करतो त्याचे हे द्योतक मुळीच नव्हे. निवडणूक आयोग या बाबतीत काहीही करू शकत नाही. फक्त फेरमतदान घेण्याचे फर्मान तेवढे काढू शकतो. आयोगाच्या हातात यापेक्षा जास्त आहे तरी काय? यावर उपाय एकच आहे. तो म्हणजे शिक्षण मंत्रालयाप्रमाणे निवडणूक मंत्रालय स्थापन करणे (Election Ministry) . प्राथमिक विद्यालयाप्रमाणे निवडणूक विद्यालयाची स्थापना करणे. त्यात सुशिक्षित आणि अशिक्षित अशा दोन्ही वर्गांतील मुलांना 'मतदान' म्हणजे काय याचे अथपासून इथपर्यंत सर्वांगीण शिक्षण दिले गेले म्हणजे पुढे निवडणूक मतदानास पात्र होतेवेळी सारासार विचार करून ते निर्भीडपणे मतदान करू शकतील.

गुंडांनाही मतदान हक्क व सुयोग्य मार्गाने अर्थार्जनाची जाणीव करून दिल्यास तेसुद्धा देशभक्ती व बंधुभाव यांनी प्रेरित होऊन असली नीच कृत्ये करण्यास तयार होणार नाहीत. प्रख्यात गुंड फूलनदेवी खासदार झाली तर मग गुंड लोकांना त्यांच्यातील माणुसकीची जागृती करून दिली तर त्या गुंडांचे 'जंटलमन' मध्ये परिवर्तन का होऊ शकणार नाही?

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या ज्या वेळी निवडणुका झाल्या त्या वेळी निवडणुकीच्या मतदान केंद्रात महाराष्ट्रातील एक मंत्री मतदान कक्षात जवळजवळ तासभर मुक्कामास होते, असे ऐकिवात आहे. हे खरे असेल तर त्या मंत्रीमहोदयांना निवडणूक कक्षेत शिरण्याचे विशेष असे काय कारण होते? तेथे पूरग्रस्त स्थिती, जातीय दंगल किंवा इतर कोणताही असा खास समारंभ नव्हता की मंत्रीमहोदयांच्या भेटीची तेथे आवश्यकता होती !

म्हणून जोपर्यंत निवडणुकांचे माहात्म्य वरपासून खालपर्यंत कोणासही कळत नाही व वळत नाही तोपर्यंत निवडणुकांची नाटके स्थगित करावीत.

मतमोजणीतही हेराफेरी होऊ शकते. 'प्रेसिडेंटस्' रूल लागू करून, सर्व सुधारणा जोपर्यंत समाजव्यवस्थेत समाविष्ट होत नाहीत तोपर्यंत या निवडणुकांना खऱ्या अर्थाने 'लोकशाहीतील निवडणुका' असे संबोधिता येणार नाही. प्रेसिडेंटस् रूलमध्ये विवेकी, विचारी, निस्पृह व निःस्वार्थी अशाच व्यक्ती हव्यात.

शासन, पक्षनेते, पोलीस व गुंड यांचे निवडणुकीच्या वेळी संगनमत असले तर त्याला 'निवडणुका' असे संबोधिता येईल काय?

कोर्टात नेहमी गीतेवर हात ठेवून 'खरे सांगेन खोटे बोलणार नाही' अशी एकदा साक्ष किंवा आरोपींनी शपथ घेतली की मग निष्णात वकील लोक ज्यांनी प्रत्यक्ष गुन्हा पाहिलेलाही नसतो. प्रथम साक्षीदाराला प्रश्नांचा भडीमार करून गांगरून टाकतात व नंतर शब्दांचा व कायद्याचा कीस पाडीत खऱ्याचे खोटे करतात व खोट्याचे खरे करतात. याला म्हणतात हातखंडा वकील ॲडव्होकेट, बॅरिस्टर, वगैरे वगैरे. यात गीतेचा काहीच दोष नसून त्या पवित्र ग्रंथाचा अपमान मात्र आहे. एकीकडे म्हणतात शासनात अध्यात्म असू नये. मग कोर्टात गीतेला आणून कशाला अपवित्र करता? महात्मा गांधींनी केलेली वकीली व हल्लीच्या काळातील वकिली यात जमीन अस्मानाचा फरक आहे ! न्यायदेवतेस मात्र जसे पुरावे व साक्षी पुढे येतील त्याप्रमाणेच शिक्षेची सुनावणी करावी लागते. न्यायदेवतेनेही गुन्हा पाहिलेला नसतो. पूर्वी ज्यूरी सिस्टिम होती. मी स्वतः पुष्कळ वेळा फोरमन होतो. आमचे एकमत झाले म्हणजे न्यायाधीश त्यावेळी शिक्षा कमी किंवा जास्त करावयाचे किंवा आरोपीस सहीसलामत सोडून द्यावयाचे. हल्ली ज्यूरी सिस्टिमच बंद

झाली आहे. याचे कारण शासनच काय ते जाणे! निवडणुका आटोपल्या म्हणजे केंद्रात अनेक खासदार अनेक स्तरांवरील मंत्री, पंतप्रधान, प्रेसिडेंट यांच्या राहण्याची सोय करावीच लागते. संरक्षणासहित अनेक सुखसोयी उपलब्ध करून घ्यावा लागतात. जसे केंद्रात तसेच अनेक राज्यं त मुख्यमंत्री, मंत्री, आमदार त्यांचे नोकरचाकर वगैरे सर्व सोयी उपलब्ध असाव्या लागतात. या सर्व खर्चाचा बोजा जनतेच्या करावरच पडतो. शिवाय अनेक आमदार, खासदार, राज्यमंत्री, केंद्रमंत्री आपापल्या निवासाचे भाडे, टेलिफोन, करभरणा, हॉस्पिटलचे बिल, परदेशी वाऱ्यांचे बिल अशा अनेक सवलतींचे देणे थकवतात. नोकरचाकर, कॅंटीन, फुकट रेल्वे पास, हवाई प्रवास अशा सर्व सुखसोयी त्यांना उपलब्ध आहेतच. याशिवाय खासदार, आमदार, मंत्री इत्यादी सर्व फौजफाट्यास सभेस हजर राहण्याचा भरपूर पगार अधिक मुबलक भत्तेही मिळतात. मोटर वाहने, पोलीस संरक्षण हेही मिळते व हे सर्व वारंवार वाढवून घेण्यास सर्वच राजकीय पक्षांची विनासायास एकी होते. असे असूनही हे माननीय महोदय आपली व्यावहारिक देणी का थकवितात, हे एक कोडेच आहे. शिवाय आपापली पदे सोडण्यास वेळ आली व निवडणूक हरले तर आमदार, खासदार आपापल्या निवासाच्या सुखसोयी सोडण्यास बिलकूल राजी नसतात. शासनाने कितीही नोटिसा पाठवल्या, कायदे दाखवले तरी ते ऐकत नाहीत. कारण सुख व ऐषाराम यांना चटावलेल्यांना हे सर्व सोडणे म्हणजे प्राण सोडण्यासारखेच वाटते. तरीही या सर्वांना पेन्शन योजनेचा लाभ मिळतोच मिळतो.

करदात्यांच्या कृपेवरच ही सर्व सुखे उपभोगिली जातात. याची साधी जाणीवही निवडणूक जिंकल्यावर अशा महाभागांना नसते. करदात्यांच्या पैशाचा दुरुपयोग करू नये व स्वार्थत्याग करून जनतेचीच जास्त सेवा करावी असे त्यांच्या गावीही नसते.

केंद्र काय अथवा राज्य काय, त्यातील निवडून आलेल्या खासदार, आमदारांनी आपल्या मतदान केंद्रातच वास्तव करणे केव्हाही उचित होईल. दिल्लीला अथवा राज्यांच्या शासकीय इमारतीत (आमदार/खासदार) यांना राहण्याची गरजच काय? घटनेत असे नमूद केले असेल असे वाटत नाही. (या म्हणण्यात चूक असल्यास क्षमा करावी.) सभा ज्यावेळी होतात त्यावेळी आपापल्या मतदारसंघातील अडीअडचणींचा प्रश्न मांडण्यासाठी सभेची नोटीस आल्यावर मीटिंगला जावे. भत्ते मिळताच रेल्वे/ हवाई वाहतूक टॅक्सी, कार वगैरे सर्व मोफत उपलब्ध आहेच. मग दिल्लीतच अथवा राज्यातील राजधानीतच वास्तव्य कायमचे ठोकून जनतेपासून दूर राहण्यात मतलब काय? लोक जे जे भोगतात (बरे अथवा वाईट) यांचा अनुभव प्रत्यक्षपणे निवडून आलेल्या उमेदवारास येऊन त्यांचे निराकरण करण्याची संधी त्यांना अशा तऱ्हेने उपलब्ध होते. संपर्क असल्यामुळे जनताही संतुष्ट असते. नाहीतर हेलपाटे घालूनसुद्धा या महाभागांची भेट घेणेही मुष्किलीचे होऊन बसते. काहीजण तर स्वतःला इतके आढ्य मानतात की भेटीला येणाऱ्यांची 'साहेब झोपले आहेत, तब्येत बरी नाही, परगावी अथवा परदेशी गेले आहेत' असे सांगून बोळवण करण्यात येते. आमदार / खासदारांचे सामाजिक वर्तन व खाजगी वर्तन यात कमालीची तफावत दिसून येते. याबद्दल आपण पुष्कळ ऐकलेही आहे आणि वाचलेही आहे. शासकीय मंत्र्यांचे खास सचिव तर असल्या कामात अत्यंत चाणाक्ष व तरबेज असतात. साहेबास कोणत्या वेळेस काय पाहिजे याची त्यांना जाणीव झालेली असते. भाषणे पण तेच तयार करून देतात. आणि आमदार/खासदार, मंत्री हे हातवारे व हावभाव करून वाचीत असतात.

**भ्रष्टाचार निर्मूलनावर प्रत्यक्ष इलाज :**

ज्याप्रमाणे गंगा, यमुना हिमालयातून उगम पावतात, त्याप्रमाणे भ्रष्टाचार व त्याच्या जोडीला आतंकवाद ही जोडी निवडणुकीच्या सिंहस्थात पर्वात उगम पावते. व्यक्ती स्वार्थ व पक्षस्वार्थ ही त्याची मूळ कारणे आहेत. प्रत्येक व्यक्तीचे मत पाहिजे; परंतु व्यक्तिस्वातंत्र्याची हमी

मात्र नाही असे काही ठळक वळण निवडणुकीच्या नाटकास लागलेले असते. कोणत्या व्यक्तीचा कसा काटा काढायचा व त्यासाठी अचूक वेळ कोणती साधावी, याची कुंडली अगोदरच मांडलेली असते. त्यानुसार अपघात, दंगली, राजकीय आजारपण (अर्थात बनावट) आणि सौदेबाजी करून गुंडपुंड लोकांना हाताशी धरून पुढाऱ्यांचे मनोरे रचले जातात. आपण वाचतो त्या फक्त बातम्या व नंतर त्या मृत व्यक्तीचे समाज कार्य, स्वभाव, इत्यादी गोष्टींचे नेहमी प्रमाणे रसभरीत गुणगान व नंतर अंत्यदर्शनाचे फोटो हार, इत्यादी समारंभाचा आखीव कार्यक्रम असतो. यात काय समजायचे ते सूज्ञांनी समजून घेतले पाहिजे. लोकशाहीचे लोकदर्शन अशा तऱ्हेने लोकांचे लोकांकरिता व लोकांकडून होत असते!

दुसरी प्रत्यक्ष व महत्त्वाची ठळक बाब म्हणजे 'पैसाचार्य'' पैसा कुठून व कसा येतो याची विचारपूस कोणीही करत बसत नाही. आणि कोणाचीही विचारण्याची हिम्मत होत नाही. आयकर विभागसुद्धा चिडीचूप असतो उठलेला आवाज तावडतोब बंद केला जातो. आता कायदाच असा केला जाईल की, या मनमानीबद्दल कोणीही कसलाही ब्र काढू नये !

अत्यंत निर्धाराने 'देशहित, समाजहित व व्यक्तीहित' या त्रिकोणाचा साधकबाधक विचार करून व त्यामुळे होणाऱ्या दूरगामी परिणामांचा सखोल अभ्यास केल्यास, ज्याप्रमाणे काळ्या ढगास प्रकाशाची पांढरी किनार असते अथवा ज्याप्रमाणे बोगदा संपल्यावर प्रकाश दृष्टिपथात येतो, त्याप्रमाणे आजचा अत्यंत काळाकुट्ट असा भ्रष्टाचाराचा ढग सामाजिक क्रांतीच्या वावटळीत साफ उडून जाईल यात शंका नाही. कोणीही कोणत्या आणाभाका व आश्वासने देऊन, कितीही प्रामाणिकपणे पक्ष काढल्यास त्या पक्षाचे घटक कोणकोणते आहेत, याचे मतदारांनी डोळसपणे परीक्षण करून असा पक्ष भ्रष्टाचाराचा जोरदार प्रवाह थोपवू शकतो की त्यात वाहून जातो, याचा साकल्याने विचार करावा. व नंतरच मतदानास प्रवृत्त व्हावे. नुसती भरघोस आश्वासने देऊन, पक्षास कोणते तरी लोकप्रिय नाव देऊन, भ्रष्टाचार कधीच निपटला जाणार नाही. आणि शासकीय यंत्रणेची तब्येतही सुधारणार नाही. जनहित, स्वार्थत्याग, बंधुभाव, समता, प्रामाणिकपणा व वेळ पडल्यास प्राणार्पण करण्यासही मागेपुढे न पाहणारे सेवकच स्वाभाविकपणे नेते होऊ शकतात. कारण अशा कार्यकर्त्यांवर / नेत्यांवर जनतेचा खात्रीने १०० टक्के विश्वास बसलेला असतो.

सद्य परिस्थितीत निदान १५ ते २० वर्षे निवडणूक व अर्थचलन ही दोन्ही बंद केली पाहिजेत. याचा अर्थ अराजकता माजून देशाचे वाटोळे व्हावे असा मुळीच नसून सर्व स्तरातून त्याची उन्नती कशी व्हावी हा आहे. ही दोन पथ्ये काही काळापुरती कडक रीतीने पाळली पाहिजेत. व सर्व सुधारणा झाल्यानंतर पथ्ये आत्मविश्वासाने मागे घेतली जाऊ शकतात, असे झाले तरच जगातील एक सामर्थ्यशाली राष्ट्र म्हणून भारताला ताठ मानेने वावरता येईल. भारताकडे वाकड्या नजरेने पाहण्याची कोणाला हिम्मत होणार नाही.

प्रथम आर्थिक शिस्त व दुसरे म्हणजे वर निर्देशित केल्याप्रमाणे निवडणूक प्रक्रियेतील संपूर्ण सुधारणा. या दोनच धोरणांचा जर संपूर्णपणे विचार करून पाठपुरावा केला तर सर्वांगाने भारताचा विकास किती झपाट्याने होईल, याची स्पष्ट कल्पना देशातील जनतेस येईलच येईल.

**वरील या दोन उपायांसाठी व हिमालयातील पाण्यासाठी जनतेने शासनाकडे लोककौल (Referendum) घेण्याचा आग्रह धरावा, शासनाने न मानल्यास सर्वोच्च न्यायालयाकडे जावे.**

भ्रष्टाचार निर्मूलनाच्या पुष्ट्यर्थ काही ठोस पावले शासनास उचलावीच लागतील. काही ढोबळ मार्गांची रूपरेषा वाचून त्यात आणखीन काही नवीन मुद्दे सुचल्यास त्याचे विवरण वाचकांनी आपल्या अंतर्यामी पटेल तसे करावे व त्याचा स्वतंत्रपणे प्रसार करावा, लोकशाहीचा खरा

पुरुषार्थ यातच आहे.

<u>१. पैशाचे चलन सर्वार्थाने बंद करून</u> - हवे तर चलनाची नाकेबंदी म्हणा - सर्व स्तरातील लोकजीवन सुरळीतपणे चालेल असा काहीतरी मार्ग काढावा - म्हणे 'जीवनरक्षा कूपन' 'जीवन साधन कूपन' 'कौटुंबिक जीवन समृद्धी कार्ड' असे काहीतरी माध्यम काढून त्यावर जीवनाचे सर्व व्यवहार पिढीजात सुरळीतपणे चालतील याची हमी शासनाने घ्यावी. म्हणजे समाजातील कोणत्याही स्तरावरील व्यक्तीस कोणत्याही नडीमुळे केव्हाही आणि कधीही मनस्ताप होऊ नये, उद्याच्या पोटापाण्याची चिंता पडू नये इत्यादी कारणांसाठी अर्थशास्त्रज्ञांच्या मते कायमचे एक चलनवजा सर्टिफिकेट अथवा कूपन, जे लवकर बिघडणार नाही असे काढावे. प्रत्येक कुटुंबात एक असे चलन वाटावे. व हा उपाय योजल्यास शिरगणती (Census) आपोआपच होईल. शिवाय अपंग, दरिद्री, रोगी, वयस्कर (Senior Citizen), तरुण मुले व मुली किती आहेत सुशिक्षित, अशिक्षित याचाही (आढावा देशातील असे शासन चालवणाऱ्यास) मिळू शकेल. जातीचा उल्लेखच यावर नसावा. कारण जातीय भेदभाव हेच कटकटीचे मूळ कारण आहे. विमा कंपन्या, म्युच्युअल फंडस्, प्रॉव्हिडंड फंड, फिक्स डिपॉझिट, स्टॉक मार्केटमधील शेअर्स वा डिबेंचर्स, कर्जरोखे व्याजावरील कर, डिव्हिडंडवरील कर वगैरे सर्व शासनाच्या नियंत्रणाखालीच असते. वर सुचविलेल्या धोरणामुळे शासनाला हा सर्व अर्थप्रपंच करण्याची जरुरी भासणार नाही.

<u>२. फलित</u> : घाम गाळून काम करून मनुष्य पुढील येणाऱ्या अडचणीस तोंड देण्यासाठी पैसा शिल्लक टाकतो. कमावणारे सर्वच असे करतात. त्यात नोकरचाकर व लहानमोठे व्यापारीही आहेत. कर भरण्याच्या चक्रव्यूहातून सुटून हे सर्व करावे लागते. जर कोणाच्या हाती रोख पगार अथवा व्यापारातील पैसा आला नाही तर त्याला कर भरावा लागणार नाही. ते सर्व शासनाकडेच जमा होतील. (येथे शासनाचे अर्थमंत्री म्हणजे रिझर्व बँक असेच समजावे. कारण प्रेसिडेंटपासून तो तहत खालील तळागाळातील चाकर मान्यापर्यंत कोणाच्याच हातात पगार पडणार नाही.) रिझर्व बँकेच्या मदतीला अनेक बँकांचे सहकार्य लाभेल व प्रामाणिक कार्यकर्त्यांचेही! कारण हे देशव्यापी, अवाढव्य काम आहे. पण धीर खचू न देता निर्धाराने, विवेकाने व देशाभिमानाने हे सर्व केले पाहिजे. प्रेसिडेंटपासून खालपर्यंत सर्वांनीच व्हाऊचरद्वारा पैसे घ्यावेत. व बँकेस हिशोबासहित शिल्लक परत करावी. आपल्या देशात परदेशी पाहुणे, मोठ्या व्यक्ती, कोणीही आल्या तरी खर्चाची शिस्त हीच असावी. म्हणजे भ्रष्टाचार होणार नाही. असे झाले म्हणजे आयकर ऑफसीची (Income Tax ) गरज भासणार नाही. तेवढे अधिकारी, नोकरवर्ग व त्यांचा पगार व बोनस, स्टेशनरी, स्टँपपेपर, पोस्टेज, व्हिजिटिंग कार्ड व भाडे इत्यादी खर्च वाचेल. देशातील इन्कम टॅक्स ऑफिसच बंद झाले तर अशा रिकाम्या व्यक्तींना त्यांच्या वयोमानाप्रमाणे व अनुभवाप्रमाणे देशसेवेच्या कार्यात अन्य ठिकाणी सामावून घ्यावे. ज्यांची घरेदारे जवळ असतील, मुलाबाळांचे शिक्षण चालू आहे अशा काही गोष्टी विचारात घेऊन जवळच्या - जवळ सामावून घ्यावे. जनतेची पोटापाण्याची काळजी सुटल्यावर ते इमानेइतबारे देशसेवा का करू शकणार नाहीत ? ज्याप्रमाणे Income Tax Office चे त्याचप्रमाणे Sales Tax. C.B.I., Excise व Octroy Duty Office ची जरुरी भासणार नाही. या सर्वांना मिळून देशातील ७० ते ८०००० कोटी टॅक्स कसा व कोणी बुडविला याची इंत्थंभूत माहिती असणारच. प्रयत्न केल्यास करबुडव्येगिऱ्यांना चव्हाट्यावर आणून लोकअदालतीसमोर शिक्षाही करता येईल. परदेशी पैसा गुंतवला असेल तर त्याचाही पत्ता प्रयत्न केल्यास लागू शकतो. बोगस कंपन्या निघण्यास पायबंद बसेल व लोकांचे पैसेही वाचतील. कारण अशा कंपन्यात कोट्यवधी लोकांचे कोट्यवधी रुपये बुडाले आहेत. शीतपेयांत कीटकनाशकांचा उपयोग - कॅन्सर होण्याची भीती. परदेशातील शीतपेये मागवावीतच का (Times of India 6-8-2003) नवाकाळ

6-8-2003

शिक्षण क्षेत्रात भ्रष्टाचारामुळे झालेला बट्ट्याबोळ सर्वांनाच माहीत आहे. राज्यातील शिक्षण संस्थांचे ४५० कोटी रुपये अडकले ( म. टा. ६-८-२००३) शिवाय शशिकांत कर्णिक व सायली जोशी प्रकरण सर्वांना परिचित आहेच. सरकारी हुकूमनाम्याने (रोख पैशाशिवाय वापरता येणारे सरकारी चलन) यामुळे सर्व प्रकारच्या दुष्टवृत्तींना आळा बसेल. केंद्रात किंवा राज्यात जे उमेदवार निवडून येतील त्यांना आपापल्या मतदारसंघातच वास्तव्य केले पाहिजे. म्हणजे तेथील जनतेशी संपर्क राहून समस्या सोडवणे सोपे होईल. अशी रिकामी झालेली निवासस्थाने दरवर्षी पास होणाऱ्या लक्षावधी विद्यार्थ्यांच्या शाळा-कॉलेजसाठी वापरता येतील. सध्या शाळेत किंवा कॉलेजात ॲडमिशन मिळविण्यासाठी काय काय नाटके करावी लागतात व त्यासाठी मुलांच्या पालकांना किती त्रास सहन करावा लागतो याची जाणीव सर्वांनाच आहे. तेव्हा हा कूटप्रश्न या मार्गाने सुटेल. शिक्षकांचे, प्रिन्सिपॉलचे, विद्यार्थ्यांचे व पुस्तके विकणाऱ्या दुकानदारांचे पोट भरण्याची व्यवस्था जर केंद्र शासनाने केली तर देणग्या, काळा पैसा जबरदस्त वाढावा की वगैरे प्रश्न आपोआपच मार्गी लागतील व शैक्षणिक क्षेत्रातील अराजकतेस आळा बसू शकेल. जातीय शिक्षणावर संपूर्ण बंदी आणावी. जातीय शिक्षण देणे, हा गुन्हा मानावा. आता देश संरक्षणाच्या तिन्ही सैन्यदलाविषयी म्हणाल तर ते या देशाचे नागरिक असून त्यांनाही मतदानाचा हक्क आहे. थंडी, ऊन, वारा, पाऊस, उपवास, जागरणे तब्येतीच्या कटकटी हे सर्व सहन करून देश रक्षणासाठी ही तिन्ही दले नेहमीच सज्ज असतात. बरेच सैनिक महिनोनमहिने कुटुंबापासून दूर असतात. अशा सैनिकांना (फ्रंटवर) व त्यांच्या गावी, त्यांच्या कुटुंबियांस जर असे चलन दिले तर सैनिकांची काळजी मिटेल की नाही? उंच पहाडावर दऱ्याखोऱ्यात टपाल वेळेवर पोहोचणे मुश्किलीचेच असते. तेव्हा जवानांच्या कुटुंबियांना मोबाइल्स दिले तर त्यांना तत्काळ संपर्क साधून क्षेमसमाचार समजू शकतो व हायसे वाटते. परंतु ही बाब सुरक्षा धोरणाच्या अखत्यारीतील आहे हे विसरू नये.

कारखाने व इतर उद्योग व उत्पादने ही चालूच राहिली पाहिजेत. मालाचा दर्जाही उंचावला पाहिजे की जेणे करून माल परदेशी पाठवून व्यापारवृद्धी करता येईल. या गोष्टींची जरूरी आहे. बरं कारखानदारी व उत्पादने यात एक मुख्य गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे. व ती सत्य आहे. नुसता पैशाचा ढीग व कच्च्या मालाचा ढीग ठेवणे म्हणजे उत्पादन होऊच शकत नाही. कामगारांचे हात लागलेच पाहिजेत. कामगार म्हणजे खऱ्या अर्थाने कारखानदारांचे 'जिवंत भांडवल' आहे. ते त्यांनी व्यवस्थितपणे निकडीने सांभाळायास हवे. यात सर्व काही आले. मग संप, टाळेबंदी, युनियनमधील मारामाऱ्या इत्यादी गोष्टींची गरजच काय? जे युनियन प्रेसिडेंट किंवा सेक्रेटरी (बाहेरील) असतील त्यांना देशसेवा कार्याच्या अन्य प्रवाहात समावून घ्यावे. देशापुढे अनेक असे प्रश्न व अनेक कार्ये आहेत की ज्यांची समग्र यादी या छोट्याशा जागेत देता येणार नाही. कारखानदारांचे जीवन आहे त्या स्तरावर चालावे. त्यांची श्रीमंती लुबाडली जावी असे काही कोणीही म्हणत नाही. फक्त कामगारांना गुलाम म्हणून न वागवता माणूस म्हणून वागवून त्यांच्या चरितार्थाची काळजी घेतली पाहिजे. काही विशिष्ट शिस्त पाळली तर पैशाशिवाय देशाचा संसार चालू शकतो - या गोष्टीचा सखोल साधकबाधक विचार तज्ज्ञांनी करावा.

स्टॉक मार्केट चालू पाहिजे, पण स्टॅम्पसच्या ऐवजी अधिकृत बँकेचा शिक्का व सही हवी. यासाठी बँकेत निराळे डिपार्टमेंट (खाते) उघडावे लागेल. या कामासाठी विपुल मनुष्यबळ (जे अनुभवी व सक्षम आहे असे) उपलब्ध होईल. मग तेलगी प्रकरण, हर्षद मेहता प्रकरण, व अशीच इतर अन्य प्रकरणे डोके वर काढू शकणार नाहीत. याप्रमाणे शासनाची व जनतेचीही डोकेदुखी कायमची बंद होईल. सगळ्याच मार्गांनी भ्रष्टाचारास आळा बसला तर केंद्र

शासनात अथवा राज्य शासनात तिजोरीचा खडखडाट कधीच भासणार नाही, किंवा परदेशी बँकांकडून कर्ज मदतीची भीकही मागावी लागणार नाही. याचप्रमाणे डॉक्टर वकील, पोलीस हेही देशसेवेस वाहून घेतील. पोटापाण्याची चिंता मिटल्यावर कामातून माघार कोण व कशासाठी घेईल. पोलिसांतील आत्महत्येच्या बातम्या बहुतेकांनी दैनिकातून वाचल्या असतील. निराशा हेच त्याचे कारण आहे. परमिट रूम, बार, छोटे छोटे दारूचे गुत्ते, सोशल क्लब, बारबाला आदींकडून काय देशसेवा घडली आहे याचे स्पष्ट उत्तर ते चालवणाऱ्यांनीच द्यावे. मोठे जमीनदार व घरमालक यांनाही देशासाठी स्वेच्छेने त्याग करावा. यामुळे निदान काही लोकांच्या पोटापाण्याचा व घरदाराचा प्रश्न नक्कीच सुटेल. क्रांतीची पाऊले वेळीच ओळखावयास हवीत.

अलीकडेच वर्ल्ड बँकेने भारतीय अर्थव्यवस्थेवर ओढलेले ताशेरे भारतीय अर्थव्यवस्था किती खिळखिळी झाली आहे व येत्या दोन-तीन वर्षात ती किती डबघाईला येईल यावर नुकतेच भाष्य केले आहे. (Times of India 21-7-2003)

माझ्या मते या सर्वांवर प्रभावी मात्रा मुख्यतः तीनच आहेत.

१. चलनबंदी म्हणजे भ्रष्टाचारावर पूर्ण आळा.

२. निवडणूक सुधारणा - म्हणजे खऱ्या अर्थाने खरी लोकशाही नांदेल.

३. हिमालयातून पाणीपुरवठा - म्हणजे पिण्याचे पाणी, शेतीसाठी पाणी व प्रदूषण इत्यादी प्रश्न मार्गी लागतील.

असो.

आपला भारत देश सर्वार्थाने सामर्थ्यशाली व संपन्न व्हावा अशी पवित्र भावना प्रत्येक भारतीयांच्या हृदयात निःस्वार्थीपणाने भारताच्या उन्नतीसाठीच आणाभाका घेऊन झटत असतात तर हेच सर्व पक्ष एकमेकाला पाण्यात का पाहतात ? एकमेकांवर चिखलफेक का करीत असतात ? चारित्र्यहनन अथवा निंदानालस्तीचा मार्ग का म्हणून पत्करतात ? याचे इतर चाणाक्ष वाचकांना स्वतःच्या अंतर्यामीच मिळेल ! 'सर्वधर्मसमभाव ' अथवा 'धर्मनिरपेक्षता' कशाशी खातात हे ते पक्ष व पक्षनेतेच काय ते जाणोत ! जनतेने मात्र याचा लक्ष्यार्थ उमजून घ्यावा व शुद्ध सिद्धांताकडे पोहोचण्याची वाटचाल धरावी. 'जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला ' हे समर्थवचन ध्यानी ठेवून कोणत्याही फसवेगिरीस पळी पडू नये.

आपल्या देशाच्या सध्याच्या आर्थिक संदर्भात वरील नानाविध सुचनांना विवेकाने साधकबाधक विचार करून पुढील येणाऱ्या शासकीय धोरणांचा सुवर्णमध्य गाठता आला तर अशा लोकशासनावर कसलाच ताण पडणार नाही. तिजोरीतही खडखडाट होणार नाही. उलट बेकारीचा प्रश्न सर्वार्थाने सुटून हिरीरीने काम करणारे बुद्धिवान व सामर्थ्यवान तरुण /तरुणी देशसेवेसाठी उपलब्ध होतील. 'नोकरकपात' व 'स्वेच्छानिवृत्ती' असल्या दळभद्री शब्दांचा मागमूसही राहणार नाही.

काही प्रतिष्ठित लेखक, वक्ता, कवी, साहित्यिक, शास्त्रज्ञ, घटनातज्ज्ञ, कायदेपंडित अथवा पक्षनेता यापैकी काहीच नाही. सर्वांच्या सारखाच मी एक साधा नागरिक आहे. परंतु हल्लीच्या स्फोटक परिस्थितीमुळे भयानक अशी क्रांतीची चाहूल लागल्यासारखी वाटते. क्रांतीचे वादळ उठले म्हणजे ते कोणालाच थोपविता येत नाही. क्रांतीने हिंसक वळण घेऊ नये, अशी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे. त्यासाठी लोकांचे, लोकांकरिता व लोकांकडून असे खऱ्या अर्थाने शासन येऊन लोक सुखी होतील. आर्थिक धोरणही 'लोकांचे, लोकांकरिता व लोकांकडून' असेच असले पाहिजे, व याची खबरदारी व जबाबदारी घेणे हे लोकशासनाचे व जनतेचेही आद्यकर्तव्य आहे.

या लेखात पुनरुक्तीचा दोष अथवा अन्य काहीउणिवा आढळल्यास सूज्ञ वाचकांची नम्रपणे मी क्षमा याचना करतो. माझ्यापेक्षा बुद्धिवान व सखोल विचार करणाऱ्या सुजाण व्यक्ती या देशात आहेत. त्यांनी कृपया, या गहन विषयावर स्वतःच्या उत्तम व भरीव सूचना व त्यावरील उपाय उमगल्यास लोकशाही तत्त्वानुसार विनधास्तपणे जनतेसमोर मांडाव्यात, अशी कळकळीची विनंती आहे.

लेखकाचे नाव आणि त्याचे शब्द हे सर्वार्थाने दुय्यम आहेत. लोककल्याणाचे खरे भांडार शब्दांच्या अर्थात व सिद्धांतातच साठलेले आहे. म्हणून देशभक्त जनतेने आपल्या शक्तीनुसार यातील भावार्थाचा स्वकष्टाने प्रसार करून तो सर्व भाषेतील जनतेप्रत पोहोचवावा. ही नुसतीच देशसेवा नसून प्रत्यक्ष जनताजनार्दनाची पूजा आहे, याची जाणीवही ठेवावी.

**वामन मल्हार जोशी**
१३, चैत्र उद्यान, होली क्रॉस शाळेजवळ,
कर्णिक रोड, कल्याण - ४२१ ३०१.
दूरध्वनी : (९५२५१) ३१२२२१

## फॉर्म - ४

वृत्तपत्र नोंदणी अधिनियम - ८ नुसार माहिती

| | | |
|---|---|---|
| **मासिकाचे नाव** | : | व्ही.पी.एम्. दिशा |
| **प्रसिद्धी काळ** | : | मासिक |
| **संपादक** | : | डॉ. विजय बेडेकर<br>बेडेकर हॉस्पिटल, ठाणे - ४०० ६०२. |
| **राष्ट्रीयत्व** | : | भारतीय |
| **मुद्रक** | : | विलास सांगुर्डेकर,<br>परफेक्ट प्रिंटस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे. |
| **प्रकाशक** | : | कार्याध्यक्ष,<br>विद्या प्रसारक मंडळ,<br>नौपाडा, ठाणे. |

पुस्तक परिचय

# संवाद - वाचनीय व संग्राह्यदेखील !

'अध्यात्म म्हणजे काय', 'देव आहे काय', 'आम्ही ध्यानधारणा केली तर आमचे मित्र आम्हाला वावळट म्हणतील. तर आमची भूमिका काय असावी?' 'केशव, नारायण अशा नावांना काही अर्थ आहे का ?' 'उपासकाने मांसाहार करू नये का ?'... हे व असे अनेक प्रश्न पडण्याचे स्वाभाविक वय म्हणजे पौगंडावस्था व नंतरच्या नवतारुण्यातील काही वर्षे. हे व असे प्रश्न पडले की तरुण मनांत शंका निर्माण होतात, संदेह निर्माण होतो, मनाची द्विधावस्था होते.

अशा प्रश्नांना उत्तरे देणारा (व तीही तरुण मनांना पटतील, समजतील व त्यांच्या मनातील संदेह दूर होईल.) अभ्यासक स्वतः या प्रश्नाचा अभ्यास केलेला, स्वतःच्या अनुभवानुसार उत्तरे ताडून पाहणारा व मुख्य म्हणजे भाषेवर प्रभुत्व असणारा हवा. विवेकानंदांच्या काळापासून हा प्रश्न पडण्याची परंपरा चालूच आहे व त्यावर आपापल्या अभ्यासानुसार उत्तरे देणारेही आहेत.

अशाच स्वरूपाच्या प्रश्नांना योग्य भाषेत व प्रभावीपणे उत्तरे देणारे एक छोटेखानी पुस्तक आमच्या बांदोडकर महाविद्यालयाचे (कनिष्ठ) विभाग उपप्राचार्य मकरंद दीक्षित यांच्यामुळे वाचनात आले. हे पुस्तक म्हणजे तात्त्विक चर्चा नाही तर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांशी संवाद साधावयाचा प्रामाणिक प्रयत्न आहे. त्यामुळे पुस्तकाचे शीर्षकही 'संवाद' असेच आहे. स्वामी माधवानंद तथा डॉ. माधव नगरकर यांनी हे संवाद साधले आहेत.

पुस्तकाची रचना चार भागांत केली आहे व एकूण ६०प्रश्न यात समाविष्ट आहेत. पुस्तक मुळातून वाचण्यासारखे आहे. त्यामुळे येथे मुद्दाम या भागांच्या नावांचा निर्देश करीत आहे-

विभाग १- आधुनिक शास्त्रीय जग आणि देवधर्मांच्या धारणा (प्रश्न १ ते १५)

विभाग २- नाममंत्र-अनुसंधान -भक्ती (प्रश्न १६ ते ३४)

विभाग ३- गुरु आणि अनुग्रह किंवा आध्यात्मिक साधनेचे मार्गदर्शन (प्रश्न ३५ ते ४३)

विभाग ४- ध्यानयोग (प्रश्न ४४ ते ६०)

संवादातून लेखकाने अतिशय प्रभावीपणे सांगितल्यामुळे तरुण मनाचे प्रश्न सुटण्यास या उत्तरांचा उपयोग होऊ शकतो.

उदा. १९ व्या प्रश्नाला उत्तर देताना (ईश्वराचे अनुसंधान म्हणजे काय ?) ते सांगतात, 'मन एखाद्या गोष्टीशी सातत्याने जोडलेले राहते म्हणजे त्या गोष्टीचे अनुसंधान .... म्हणूनच संशोधन केंद्रांना अनुसंधान केंद्र म्हणत असावेत.'

किंवा

प्र. क्र. ३० - गायत्री मंत्रासंबंधात ते सांगतात, ''मोठ्याने उच्चार करून परमार्थाचे प्रदर्शन करू नये'' तर केव्हा, कसा, कोणी हा मंत्र म्हणावा याबद्दल चांगले मार्गदर्शन त्यांच्या अभ्यासातून मिळतं.

छोट्या प्रास्ताविकात आपला हेतू स्पष्ट करताना ते म्हणतात, 'नीट माहिती आणि मांडणी यातून दोन पिढ्यांमध्ये संवाद निर्माण व्हावा यासाठी हा हौसेचा प्रपंच'' दोन पिढीतील विसंवादाचे कारण नेमके हेरून घेतलेल्या या भूमिकेमुळे पुस्तिका प्रत्येक तरुणाला उपयुक्त ठरणारी झाली आहे.

संवाद **स्वामी माधवानंद** ( डॉ. माधव नगरकर)
प्रकाशक - सत्संग योग प्रतिष्ठान, पुणे. - २००४
पृष्ठे- ९२ आकार - पॉकेट बुक

परिचय - प्रा. मोहन पाठक,
ठाणे.

# परिसर वार्ता

### विज्ञान - हस्तचित्रकला प्रदर्शन

### सौ. आनंदीबाई केशव जोशी इ. मिडीअम स्कूल

सौ. आनंदीबाई केशव जोशी शाळेत दि. १६ फेब्रुवारी २००४ ला विज्ञान, हस्तचित्रकला प्रदर्शन संपन्न झाले. विविध देशांमधून कॉमनवेल्थचे १६ सदस्य शाळेला भेट देण्यासाठी आले होते. प्रथम त्यांचे स्वागत करण्यात आले. शाळेच्या मुख्याध्यापिका कोल्हटकर मॅडम यांनी पाहुण्यांना शाळेच्या विविध उपक्रमांची ओळख करून दिली. त्यानंतर पाहुण्यांनी दीपप्रज्वलन करून प्रदर्शनाचे उद्घाटन केले. पाहुण्यांनी स्वतःबद्दल माहिती दिली व त्यानंतर प्रदर्शनाला भेट दिली. विविध विषयांवरील प्रकल्प विशेषतः गणितावरील प्रकल्प पाहून पाहुणे अत्यंत प्रभावित झाले. शाळेच्या विद्यार्थ्यांनी पाहुण्यांच्या हातावर मेंदी रेखाटून भारतीय कलेचा नमुना सादर केला.

प्रदर्शनात इतिहास, भूगोल, मराठी इ. विविध विषयांवरील विद्यार्थ्यांनी तयार केलेले प्रकल्प ठेवलेले होते.

वर्गनिहाय विज्ञानाचे प्रयोग खालीलप्रमाणे होते :-

इ. ५वी - रॉकेट मॉडेल, वायूप्रदूषण, सांध्याचे प्रकार

इ. ६वी - हायड्रो-इलेक्ट्रिसिटी सबमरीन, व्होलकॅनो सोलार सिस्टिम

इ. ७वी - पावसाच्या पाण्याची साठवणूक, थंड प्रदेशात वृक्षसंवर्धनासाठी ग्रीनहाऊस.

इ.८वी - किडनीच्या समस्यांविषयी जागरूकता.

इ. ९वी - कृष्णविवर, फुफ्फुसाचे कार्य इ.

गणित हा कठीण विषय सोपा व रंजक करण्यासाठी अनेक शैक्षणिक साधनांचा वापर कसा करावा, याविषयी काही प्रकल्प होते.

गणित - वर्तुळाचे क्षेत्रफळ काढणे, पायथागॉरसचा सिद्धांत, मेट्रिक मोजमापे इ.

प्राथमिक विभागाच्या विद्यार्थांनी नागरी सुविधांविषयी विविध मॉडल्स तयार केली होती. उदा. बँक, शाळा, दवाखाना, रेशन दुकान इ.

हस्तचित्रकलेच्या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी काढलेली अनेक सुंदर चित्रे व हस्तकलेच्या विविध वस्तू ठेवल्या होत्या.

वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीला लागणारे व विद्यार्थ्यांच्या कलागुणांना उत्तेजन देणारे असे हे विज्ञान-हस्त-चित्रपदर्शन हा शालेय जीवनातील एक अत्यंत महत्त्वपूर्ण उपक्रम आहे.

### डॉ. बेडेकर विद्यामंदिर (मा. वि.)

- ८ फेब्रुवारी २००४ रोजी बेव्हज् म्यूझिकलच्या सौजन्याने इ. ८वी च्या विद्यार्थ्यांना 'वाद्यांची ओळख' या कार्यक्रमात काही वाद्यांची माहिति देण्यात आली. या कार्यक्रमासाठी ती वाद्ये शाळेच्या कलादालनात आणण्यात आली होती. बासरी व गिटार यांचे प्रात्यक्षिक झाले. मुलांचा सहभाग उत्तम होता. हा कार्यक्रम कलाशिक्षिका सौ. मंजिरी दांडेकर यांनी आयोजित केला होता.

- दि. १९ फेब्रुवारी २००४ रोजी शाळेच्या कलादालनात मुलांच्या चित्रांचे प्रदर्शन आयोजित केले होते. त्याचे उद्घाटन परदेशी पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सविता केळकर, उपमुख्याध्यापिका सौ. मीना गाडगीळ, पर्यवेक्षिका सौ. अनुराधा खोपकर, वि.प्र.



वार्षिक चित्रकला प्रदर्शनात कलाशिक्षिका सौ. मंजिरी दांडेकर यांनी रेखाटलेले रंगावली माध्यमातील चित्र.

मंडळाचे सभासद दिलीप जोशी उपस्थित होते. पाहुण्यांनी विद्यार्थ्यांच्या चित्रकलेची मुक्तकंठाने स्तुती केली. विविध विषय-जाहिरात, पुस्तकांची मुखपृष्ठे, संकल्पचित्रे, स्मरणचित्रे. विविध तंत्रात रंगवलेली चित्रे पाहून पाहुणे हरखून गेले होते. याच प्रदर्शनाचे औचित्य साधून शाळेतील कलाशिक्षिका सौ. मंजिरी दांडेकर यांनी रांगोळी माध्यमात एक व्यक्तिचित्र रेखाटले होते. त्याचेही उपस्थितांनी कौतुक केले. या प्रदर्शनासाठी श्री. कोळी व श्री. वैद्य यांनीही मार्गदर्शन केले.

याच वेळी मुलांनी तयार केलेल्या वस्तूंचेही प्रदर्शन विद्यालंकार सभागृहात आयोजित करण्यात आले होते. त्यात विविध आकाराच्या फुलदाण्या, ऑरगंडी, लोकरीपासून तयार केलेली फुले, भरतकाम वगैरे विविध वस्तू प्रदर्शित करण्यात आल्या होत्या. त्याचेही पाहुण्यांनी कौतुक केले. या प्रदर्शनासाठी हस्तकलाशिक्षिका सौ. कल्पना बोरवणकर व सौ. सुनंदा गोतावळे यांनी मार्गदर्शन केले.

- विद्यालंकार सभागृहात खास पाहुण्यांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. महाराष्ट्रीय सण, गोंधळ, लेझीम, मानवी मनोऱ्यांचे उत्तम प्रदर्शन झाले.

- दि. १ मार्च २००४ रोजी डोंबिवली येथील डॉ. आंबेडकर कलादालनात आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या चित्रांचे प्रदर्शन ठाणे जिल्हा कलाध्यापक संघाने आयोजित केले होते. आपल्या शाळेबरोबरच उल्हास विद्यालय-उल्हासनगर, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर-डोंबिवली व रोटरी स्कूल ऑफ डेफ, डोंबिवली याही शाळा सहभागी होत्या. या प्रदर्शनातही आपल्या शाळेने बाजी मारली. विविध विषय व विविध तंत्रांच्या हाताळणीमुळे आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांची चित्रे सर्वांना आकर्षित करत होती. या प्रदर्शनानिमित्ताने सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टमधील प्रा. प्रभाकर पाटील व महाराष्ट्र कलाध्यापक संघाचे अध्यक्ष श्री. सुभाष पाटील हेही उपस्थित होते. त्यांनीही मुलांच्या कलाभिव्यक्तीचे कौतुक केले.

- संकलित

दिशा
नियमित वाचा